रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक ३५५
www.ramprahar.com
गुरुवार, १३ जुलै २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

घारापुरीतील वीजपुरवठा सुरळीत करण्याचे काम युद्धपातळीवर/२
खारघरमध्ये अमली पदार्थप्रकरणी रिक्षाचालक जेरबंद/६
किक बॉक्सिंगमध्ये जासईच्या शुभम म्हात्रेला दोन 'सुवर्ण'/८




**कर्नाळा बँक घोटाळा**

# आणखी संचालकांना दणके

## सुभाष देशपांडे, रवींद्र चोरघे यांचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले

**पनवेल : प्रतिनिधी**

कर्नाळा नागरी सहकारी बँकेत केलेल्या ५१२.५० कोटी रुपयांच्या घोटाळाप्रकरणी गुन्हे अन्वेषण विभागाच्या पुणे येथील आर्थिक शाखेकडून तपास सुरू आहे. या प्रकरणात अटक होऊ नये यासाठी बँकेचे उपाध्यक्ष असलेले संचालक सुभाष मधुकर देशपांडे व संचालक रवींद्र श्रावण चोरघे यांनी केलेले अटकपूर्व जामीन अर्ज पनवेलचे अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश जयराम वडणे यांनी बुधवारी (दि. १२) फेटाळले.

कोट्यवधींच्या कर्नाळा बँक घोटाळा प्रकरणाचा तपास गुन्हे अन्वेषण विभागाच्या पुणे येथील आर्थिक शाखेच्या सहाय्यक पोलीस आयुक्त मिना जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाल्यावर बँकेच्या सीईओ अपर्णा वडके यांना अटक करण्यात आली. त्या वेळी घोटाळ्याचे सूत्रधार असलेले बँकेचे अध्यक्ष व शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांचे चिरंजीव व बँक संचालक अभिजित पाटील यांनी जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. त्यांचा अर्ज पनवेलचे अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश जयराम वडणे यांनी तसेच त्यानंतर उच्च न्यायालयातही फेटाळण्यात आला. मग बँकेचे दुसरे सीईओ हेमंत सुताने यांना अटक करण्यात आली. त्यामुळे संचालक






मंडळात घबराट पसरल्याने आपल्याला केव्हाही अटक होऊ शकते या भीतीने संचालक सुभाष देशपांडे व रवींद्र चोरघे यांनी जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता.

या वेळी न्यायालयात बचाव पक्षाने आणलेले उच्च न्यायालयातील वकील विजय थोरात यांनी सहकारी बँकेवर आरबीआयचे डायरेक्ट नियंत्रण नसते, तर संचालक मंडळाचे तिच्यावर नियंत्रण असल्याने ती वित्तीय संस्था आहे. बँक या व्याख्येत ती बसत नसल्याचे म्हटले. त्यामुळे या केसमध्ये महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम १९९९ (एमपीआयडी अ‍ॅक्ट) लागत नाही असा बचाव केला होता, मात्र सरकारी वकील यशवंत भोपी यांनी सर्वोच्च न्यायालयाचे विविध निकाल सादर करून एमपीआयडी अ‍ॅक्ट या गुन्ह्यात लागत असल्याचे दाखवून दिले. पनवेलचे अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश जयराम वडणे यांनी बुधवारी निकाल देताना ते मान्य करून बँकेचे संचालक सुभाष देशपांडे व रवींद्र चोरघे यांचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावले.

## खातेवाटप, मंत्रिमंडळ विस्ताराचा निर्णय आज संध्याकाळपर्यंत होईल

■ खासदार सुनील तटकरे यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**



राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते अजित पवार व सहकारी शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सहभागी झाले आहेत. त्यानंतर खातेवाटप व मंत्रिमंडळ विस्तार कधी होणार याबाबत तर्कवितर्क लावले जात आहेत. अशातच राष्ट्रवादीचे नेते खासदार सुनील तटकरे यांनी उद्या संध्याकाळपर्यंत खातेवाटप आणि मंत्रिमंडळ विस्ताराबाबत निर्णय झालेला तुमच्यासमोर येईल, अशी माहिती बुधवारी (दि. १२) दिली. ते पत्रकारांशी बोलत होते.

खासदार सुनील तटकरे म्हणाले, हा काही तिढा नाही. राज्याचे मंत्रिमंडळ स्थापन झाल्यापासून अजित पवार दिल्लीला गेलेले नाहीत. रायगडच्या पालकमंत्रिपदाबाबत आम्ही कधीही आग्रही नव्हतो. ज्या वेळी एकत्रितपणे काम करायचे ठरलेले असते त्या वेळी त्याबाबतची जाणीव मनात ठेवून काम करणे गरजेचे असते. मला वाटते की, याबाबतचा योग्य तो निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्यांच्या स्तरावर घेतील आणि आम्ही सर्वजण त्यांच्याबरोबर एकजुटीने काम करण्यासाठी बरोबर आहोत, असेही खासदार तटकरे यांनी नमूद केले.

---

# पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली देश नव्याने घडतोय -आमदार प्रशांत ठाकूर

**उत्तर रायगड महिला मोर्चाची बैठक उत्साहात**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश नव्याने घडत आहे, असे प्रतिपादन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी बुधवारी (दि. १२) येथे केले. ते उत्तर रायगड भाजप महिला मोर्चाच्या बैठकीत बोलत होते. या वेळी महिलांनी भरड धान्यापासून बनवलेल्या जेवणाचा एकत्र आस्वाद घेतला.

(छाया : अक्षय शाडुल)





आंतरराष्ट्रीय पातळीवर २०२३ हे भरड धान्य वर्ष जाहीर झाले असून ५ ते २५ जुलैदरम्यान अभियान राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांच्या सूचनेनुसार उत्तर रायगडात १०० कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने उत्तर रायगड महिला मोर्चाची बैठक प्रदेश उपाध्यक्ष वर्षा भोसले आणि भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत पनवेल येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झाली.

या बैठकीस भाजप महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्ष आम्रपाली साळवे, प्रज्ञा धवण, सरचिटणीस मंजुषा कुद्रीमोती, सचिव शिल्पा मराठे, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, केंद्रीय समन्वयक सरचिटणीस संध्या शारबिद्रे, पनवेल तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत, उरण तालुकाध्यक्ष राणी म्हात्रे, पनवेलच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, शहर अध्यक्ष वर्षा नाईक, माजी नगरसेविका दर्शना भोईर, निता माळी, अ‍ॅड. वृषाली वाघमारे, राजश्री वावेकर, महिला मोर्चाच्या सपना पाटील, सुहासिनी केकाणे, अंजली इनामदार, मोना अडवाणी, प्रतिभा भोईर, साधना पवार, मृणाल खेडकर, सुप्रिया मुकादम, शिल्पा म्हात्रे, दिपाली तिवारी यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्त्या उपस्थित होत्या. **(पान २ वर..)**

---

## निवडक

### राज्य आपत्ती निवारणासाठी महाराष्ट्राला सर्वाधिक निधी

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारकडून बुधवारी (दि. १२) देशातील २२ राज्यांना आपत्ती निवारणासाठी ७५३२ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला. त्यामध्ये महाराष्ट्राला सर्वाधिक १४२०.८० कोटी रुपयांचा निधी दिला आहे. या यादीत उत्तर प्रदेश दुसऱ्या, तर ओडिशा तिसऱ्या क्रमांकावर आहे. केंद्राच्या अर्थ मंत्रालयाकडून हा निधी वितरीत करण्यात आला आहे.

### यशस्वी जैस्वाल, इशान किशन यांचे टीम इंडियात पदार्पण

**डॉमिनिका :** वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात यशस्वी जैस्वाल आणि इशान किशान यांचे भारतीय क्रिकेट संघात पदार्पण झाले. विंडीजने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली आहे.

**रायगडचे पर्जन्यमान**

**२४ तासांतील पाऊस : ०४.४ मिमी**
**एकूण पाऊस : ८३५.२४ मिमी**

## महिलेशी गैरवर्तनाच्या निषेधार्थ रसायनी-मोहोपाडा परिसरात बंद

**सर्वपक्षीय आक्रमक; डॉक्टरवर विनयभंगाचा गुन्हा दाखल**



**मोहोपाडा, रसायनी : प्रतिनिधी**

महिला रुग्णाशी गैरवर्तन करणाऱ्या डॉक्टरचा बुधवारी (दि. १२) रसायनी, मोहोपाडा परिसरात बंद पाळून सर्वपक्षीयांनी निषेध केला. या वेळी अत्यावश्यक सेवा वगळता सर्व दुकाने बंद होती. दरम्यान, रसायनी पोलिसांनी या डॉक्टरविरोधात आता विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे.

रुग्ण महिला व तिच्या कुटुंबीयांना डॉक्टरने धक्के मारून बाहेर काढल्याचा प्रकार ८ जुलै रोजी खालापूर तालुक्यातील रिस येथील हॉस्पिटलमध्ये घडला होता. डॉ. मंगेश बंग यांच्या हॉस्पिटलमध्ये समरीन कुरेशी ही महिला उपचार घेत होती. तिच्या तब्येतीमध्ये सुधारणा होत नसल्याने भाऊ रेहमान लांबतुरे हे डॉ. बंग यांच्याकडे विचारपूस करण्यासाठी गेले असता डॉक्टरने त्यांना शिवीगाळी व दमदाटी करीत धक्के मारून हॉस्पिटलच्या बाहेर काढले. त्या वेळी त्यांनी रुग्ण महिलेचा हात पकडून अपशब्दही उच्चारले. याचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. **(पान २ वर..)**

## संजय राऊतांच्या घरात शिरला साप

**मुंबई : प्रतिनिधी**

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्या मुंबईतील भांडूप येथील निवासस्थानी बुधवारी (दि. १२) पत्रकार परिषदेदरम्यान साप शिरला. त्यामुळे गोंधळ उडाला.

पाणदिवड जातीचा हा बिनविषारी साप होता. विशेष म्हणजे हा साप खासदार संजय राऊत यांच्या दिशेने चालला होता. सुरक्षा रक्षकांनी सापाला हुसकवण्याचा प्रयत्न केला, मात्र तो जात नव्हता. अखेर सर्पमित्रांना बोलवण्यात आले. त्यांनी या सापाला पकडले आणि नैसर्गिक अधिवासात सोडून दिले. त्यानंतर तेथे उपस्थित सगळ्यांनीच सुटकेचा निःश्वास सोडला.

दरम्यान, या घटनेवरून आमदार नितेश राणे यांनी खासदार राऊत यांची खिल्ली उडवली आहे.

## कर्जत भाजपकडून उद्धव ठाकरेंचा निषेध

(छाया : विजय मांडे)



**कर्जत : प्रतिनिधी**

भाजप नेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केलेल्या गलिच्छ टीकेबद्दल कर्जत भारतीय जनता पक्षाच्या वतीने ठाकरे गटाचे प्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा बुधवारी (दि. १२) जाहीर निषेध करण्यात आला. या वेळी कार्यकर्त्यांनी घोषणा दिल्या तसेच यापुढे अशा प्रकारच्या टिकेला तीव्र विरोध केला जाईल, असा इशाराही देण्यात आला.

निषेधावेळी कर्जतच्या टिळक चौकात भाजपचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य सुनील गोगटे, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, तालुका चिटणीस जनार्दन म्हसकर, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष प्रमोद पाटील, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष स्नेहा गोगटे, जिल्हा चिटणीस बिनीता घुमरे, विजय जिनगरे, दिनेश गणेगा, सर्वेश गोगटे, मिनेश मसणे, राहुल मसणे, सुर्यकांत गुप्ता, दर्शन कांबरी, राजेश ठाणगे, महेश भगत आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी उद्धव ठाकरे यांच्याविरुद्ध 'शिल्लक सेनेचे नेते उद्धव ठाकरे हाय हाय' अशा घोषणा देऊन निषेध नोंदविण्यात आला. ठाकरे यांनी माफी मागावी, अशी मागणीसुद्धा करण्यात आली. सुनील गोगटे यांनी, उद्धव ठाकरे यांनी कोण कलंकित आहे त्याचे आत्मपरीक्षण करावे, असे सूचित केले, तर दीपक बेहेरे यांनी, कोविड काळात मुख्यमंत्री असताना प्रत्येक गोष्टीत भ्रष्टाचार झाला, दोन साधूंची हत्या झाली आदी गंभीर घटना घडल्या. त्याला कलंक म्हणायचे की काय म्हणायचे, असा प्रश्न उपस्थित केला.

मुख्यमंत्रिपदावर राहिलेल्या उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर खालच्या स्तरावरून टीका केल्याने भाजप नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. ठिकठिकाणी ठाकरे यांचा निषेध केला जात आहे.

---

## एनडीआरएफचे पथक शनिवारी महाडमध्ये होणार दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**



अतिवृष्टीमुळे नैसर्गिक आपत्ती आल्यास तत्काळ बचावकार्य सुरू करता यावे यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) पथक शनिवारी (दि. १५) महाड येथे दाखल होणार आहे.

गेल्या काही वर्षांत रायगड जिल्ह्याला अनेक नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागले आहे. अशावेळी मदत व बचाव काम सुरू करण्यासाठी एनडीआरएफला पाचारण करावे लागते. एनडीआरएफचे मुख्यालय पुणे येथे आहे. एनडीआरएफचे पथक रायगड जिल्ह्यात पोहचेपर्यंत उशीर होतो. त्यामुळे पावसाळ्यामध्ये रायगडात एनडीआरएफचे पथक तैनात करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार हे पथक जिल्ह्यात येणार असून सप्टेंबरपर्यंत महाड येथे असणार आहे.

पुढील आठवड्यापासून रायगड जिल्ह्यात पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. ज्या जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे पूर येण्याची शक्यता असते त्या जिल्ह्यात एनडीआरएफचे पथक तैनात करण्याच्या निर्णय घेण्यात आला आहे. त्यात रायगड जिल्ह्याचाही समावेश आहे.

## रोह्यात विद्यार्थ्यांनी घेतला भात लावणीचा आनंद



**धाटाव : जितेंद्र जाधव**

रायगड जिल्ह्यात खरीपातील भातशेतीचा हंगाम सुरू झाला आहे. चांगल्या पावसामुळे बळीराजा सुखावला असून सध्या शेतीकामात व्यस्त आहे. या पार्श्वभूमीवर रोहा तालुक्यातील महादेववाडी येथील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी शेतात जाऊन स्वतः भात लावणीचा अनुभव घेतला.

रायगड जिल्हा हा पूर्वी भाताचे कोठार म्हणून ओळखला जात असे. वाढते औद्योगिकीकरण तसेच कृषी व्यवसाय परवडेनासा झाल्याने हल्लीची तरुण पिढी शेतीकडे दुर्लक्ष करताना दिसत आहेत, परंतु मुलांना शेतीची आवड निर्माण व्हावी व प्रत्यक्षात माहिती मिळावी यासाठी महादेववाडी येथील शाळेचे मुख्याध्यापक रामचंद्र भोईर, नारायण गायकर यांनी इयत्ता पाचवी, सहावी व सातवीतील विद्यार्थ्यांना गावातील गणेश सुतार यांच्या शेतामध्ये घेऊन गेले. या वेळी शेतकरी सुतार यांनी मुलांना बैलांच्या सहाय्याने किंवा ट्रॅक्टरने शेती कशी नांगरावी, रोपे कशा पद्धतीने बांधून लागवड करावी, पारंपरिक पद्धतीने व अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून शेती कशी केली जाते याची माहिती दिली.

कृषीविषयक उपक्रम राबविण्यासाठी संतोष तपकिरे, ललित लेंडी, आश्विनी नाईक तसेच शाळा कमिटी अध्यक्ष निलेश सुतार, उपाध्यक्ष संगीता भगत, जितेंद्र जाधव, अश्विनी सुतार यांचे सहकार्य लाभले.

## सप्तश्रृंगी घाटात एसटी बसचा अपघात
## महिलेचा मृत्यू, १८ प्रवासी जखमी

**वणी : प्रतिनिधी**

नाशिकमधील वणी येथील सप्तश्रृंगी घाटातून एसटी बस दरीत कोसळली. या अपघातात एका महिलेचा मृत्यू, तर अन्य १८ प्रवासी जखमी झाले आहेत. हा अपघात बुधवारी (दि. १२) सकाळी साडेसहाच्या सुमारास झाला.



राज्य परिवहन महामंडळाची बुलढाण्यातील खामगाव आगाराची बस मंगळवारी रात्री सप्तश्रृंगी गडावर मुक्कामाला होती. त्यानंतर बुधवारी सकाळी परतीच्या प्रवासात घाटमार्गावरील गणपती पॉइंटजवळ चालकाला वळणाचा अंदाज न आल्याने बस ४०० फूट दरीत कोसळली. या अपघातात आशाबाई राजेंद्र पाटील (मुडी, ता. अमळनेर) यांचा मृत्यू झाला, तर इतर १८ प्रवासी जखमी झाले आहेत. त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मृत महिलेच्या नातेवाईकास एसटी महामंडळाकडून १० लाखांची मदत जाहीर करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जखमींवर शासकीय खर्चाने उपचार करण्यात येणार आहेत.

दरम्यान, नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली तसेच अपघातात जखमी झालेल्या प्रवाशांची वणी येथील रुग्णालयात भेट घेत प्रकृतीची विचारपूस केली.

पान १ वरून

## पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली देश नव्याने घडतोय -आमदार प्रशांत ठाकूर


या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्या कार्यकर्त्या वर्षाचे ३६५ दिवस पक्षासाठी सकारात्मक ऊर्जा निर्माण करीत असल्याचे प्रतिपादन केले तसेच मोदी सरकारने गेल्या नऊ वर्षांत केलेल्या कार्याची माहिती जनतेपर्यंत पोहचवा, असे आवाहन केले. दरम्यान, भाजप महिला मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हा चिटणीसपदी दिपाली तिवारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना प्रदेश उपाध्यक्ष वर्षा भोसले यांच्या हस्ते या वेळी नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

## महिलेशी गैरवर्तनाच्या निषेधार्थ रसायनी-मोहोपाडा परिसरात बंद

या प्रकरणी रसायनी पोलिसांनी डॉक्टरविरोधात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली होती, मात्र या घटनेबद्दल लोकभावना तीव्र होती. या घटनेचा निषेध करण्यासाठी व परिसरात पुन्हा असा प्रकार होऊ नये म्हणून बुधवारी मोहोपाडा, चांभार्ली, वावेघर, रिस, दांडफाटा, पराडे, येथील बाजारपेठा दुपारी १२ वाजेपर्यंत बंद ठेवून सर्वपक्षीयांनी मोहोपाडा येथे निषेध रॅली काढली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून रॅली सुरू होऊन बाजारपेठेतून मोहोपाडा नाक्यावर पोलीस चौकीजवळ शांततेत विसर्जित करण्यात आली. रुग्णांच्या भावना दुखावणाऱ्या डॉक्टरविरोधात कायद्यान्वये गुन्हा दाखल करावा; अन्यथा रसायनीतील सर्वपक्षीय पदाधिकारी पुढे विविध मार्गांनी आंदोलन सुरू ठेवतील, असा इशारा या वेळी देण्यात आला.

रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी यांनी आरोपी डॉ. मंगेश बंग यांच्याविरोधात विनयभंगाचा गुन्हा भा.दं.वि. कलम ३५४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये दाखल केला असून अधिक तपास सुरू आहे.

# खंडणीप्रकरणी मनसे जिल्हा उपाध्यक्ष संदीप ठाकूर साथीदारांसह अटकेत


**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील मुद्रांक विक्रेता हबीब खोत यांच्याकडून तीन लाखांची खंडणी मागितल्याप्रकरणी मनसे जिल्हा उपाध्यक्ष संदीप ठाकूर व त्यांचे साथीदारांना पेण पोलिसांनी अटक केली आहे.

फिर्यादी हबीब खोत यांचा पेण तहसील कार्यालयाच्या आवारात मुद्रांक विक्रीचा व्यवसाय असून या व्यवसायाविरोधात तहसील कार्यालयात तक्रार न करण्यासाठी एकाने हबीब खोत यांना भेटून संदीप ठाकूर यांच्याशी संपर्क साधण्यास सांगितले. त्यानुसार सायंकाळी फिर्यादींनी संपर्क केला असता, संदीप ठाकूर यांनी फिर्यादींना १ जुलै रोजी राजू पोटे मार्ग, नारायण निवास येथील कार्यालयात भेटण्यासाठी बोलविले. त्याप्रमाणे फिर्यादी गेले असताना आरोपी संदीप ठाकूर, रफीक तडवी, शालोम पेणकर यांनी फिर्यादीला चाकूचा धाक दाखवून सुरुवातीस तीन लाख रु. व प्रत्येक महिन्यास ४० हजार रुपयांची खंडणी मागितली व न दिल्यास परवाना रद्द करण्याची व जिवाचे बरेवाईट करण्याची धमकी दिली.

तडजोडीअंती दोन लाख रुपये देण्याचे ठरले. यानुसार ७ जुलै रोजी आरोपीने संदीप ठाकूर यांच्या वतीने ५० हजार रुपये रोख फिर्यादीकडून स्वीकारले. उर्वरित दीड लाख रुपये रक्कम ११ जुलै रोजी देण्यात सांगितले.

या प्रकरणी फिर्यादी हबीब खोत यांनी पेण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असता पोलीस उपअधीक्षक शिवाजी फडतरे, पेणचे पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांनी सापळा रचून उर्वरित दीड लाखांची खंडणी घेताना संदीप ठाकूर यांच्या हस्तकाला ताब्यात घेतले.

आपण ही खंडणी संदीप ठाकूरसाठी घेतल्याचे त्या व्यक्तीने सांगितल्यानंतर संदीप ठाकूर यांना पोलिसांनी अटक केली. आरोपी संदीप ठाकूर, रफिक तडवी, शालोम पेणकर व आणखी एकाविरोधात खंडणीचा गुन्हा नोंदवून त्यांना अटक केली. अधिक तपास डीवायएसपी शिवाजी फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ हा करीत आहेत.

## घारापुरीतील वीजपुरवठा पूर्ववत करण्याचे काम युद्धपातळीवर

**मुंबई** : घारापुरी बेट हे महावितरणच्या पनवेल शहर विभागाच्या पनवेल १ उपविभागांतर्गत येते. फेब्रुवारी २०१८मध्ये तीन २२ केव्ही सिंगल कोर सब मरीन केबलच्या सहाय्याने २०० केव्हीए रोहीत्राद्वारे घारापुरी बेटावरील राजबंदर, शेतबंदर, मोराबंदर, या गावात विद्युत पुरवठा कार्यान्वित करण्यात आला आहे.

सद्यस्थितीत दोन नादुरुस्त सिंगल कोर सबमरीन केबलमधील दोष न्हावाखाडी ते मोरा बंदरदरम्यान समुद्रात असल्याने अडचणींवर मात करीत हे काम प्रगतीपथावर चालू आहे.


महावितरण

## ई-निविदा सूचना

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणाऱ्या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-५७, टी-५८, टी-५९ आणि टी-६०/(२०२३-२४) अशा चार निविदा महावितरण कंपनीच्या **www.mahadiscom.in** या e-Tender च्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि. १३.०७.२०२३ पासून ते दि. १९.०७.२०२३ पर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख दि. २०.०७.२०२३ ला दुपारी १.०० वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

(सही)
कार्यकारी अभियंता (स्था.)
स्थापत्य विभाग, भांडुप


## पनवेल महानगरपालिका, पनवेल

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

ई-निविदा सूचना क्र : पमपा/सा.बां. (उद्यान)/२२२३/प्र.क्र.२१/५२३/२०२३ दिनांक : १२/०७/२०२३

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम रुपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हददीतील कामोठे येथील प्लॉट नं. ४५ सेक्टर-५ मधील उद्यान नुतनीकरण करणे. (व्दितीय वेळ) | PMC/ PWD / Garden/ ३४/२०२३ | २१,४२,६९०/- (GST वगळून) | २२,०००/- | ३ महिने |
| २ | पनवेल महानगरपालिका हददीतील कामोठे येथील प्लॉट नं. २८,३५,३६ सेक्टर - २० मधील उद्यान नुतनीकरण करणे.(व्दितीय वेळ) | PMC/ PWD / Garden/ ३५/२०२३ | २२,२५,४७३/- (GST वगळून) | २३,०००/- | ३ महिने |
| ३ | पनवेल महानगरपालिका हददीतील कामोठे येथील प्लॉट नं. २०२ सेक्टर - २१ मधील उद्यान नुतनीकरण करणे. (व्दितीय वेळ) | PMC/ PWD / Garden/ ३६/२०२३ | १४,०२,८३१/- (GST वगळून) | १४,०००/- | ३ महिने |
| ४ | पनवेल महानगरपालिका हददीतील कळंबोली मधील आंबेडकर नगर येथील प्रभाग क्र. ७, सेक्टर १८ मधील खेळाचे मैदानाची दुरूस्ती करणे..(व्दितीय वेळ) | PMC/ PWD / Garden/ ३७/२०२३ | ६,८१,७३५/- (GST वगळून) | ७०००/- | २ महिने |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १३/०७/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
(डॉ. प्रशांत रसाळ)
अतिरिक्त आयुक्त-I
पनवेल महानगरपालिका, पनवेल

RNI No. MAHBIL/2009/36619

सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन राजपत्र
## असाधारण भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ९, अंक ४९(२) शुक्रवार, जुलै ७, २०२३ / आषाढ १६, शके १९४५ पृष्ठे ४, किंमत रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ७५**

**प्राधिकृत प्रकाशन**

### उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १, उरण

### अधिसूचना

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक भूसंपादन/कात-२ / सीआर /२९ / २०२१ - ज्या र्थी, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाची अधिसूचना क्र. मिस /११/२०१४/सीआर / ७७ / अ२, दिनांक १९ जानेवारी २०१५ ( या यापुढे सदर अधिसूचना असे संबोधले जाईल) भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ३ पोट-कलम (ई) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून असे अधिसूचित केले आहे की, सदर अधिनियमाच्या कलम ३ (झअ) अन्वये सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिनीच्या संपादनाबाबत सदर जिल्ह्याचा जिल्हाधिकारी या कायद्यान्वये अंमलात आणावयाच्या कार्यवाहीसाठी समुचित शासन असल्याचे मानले जाईल.

त्याअर्थी, सदर अधिसूचना अन्वये जिल्हाधिकारी, रायगड हे समुचित शासन आहे. त्याअर्थी, परिशिष्ट १ मध्ये नमूद जमीन ही सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्याची आवश्यक आहे किंवा आवश्यकता भासू शकते तसेच सार्वजनिक प्रयोजनावाबतचे निवेदन परिशिष्ट २ मध्ये करण्यात आले आहे. त्याअर्थी सदर कायद्याचा कलम ११ उप-कलम (१) अन्वये अधिसूचीत करण्यात येते की, सार्वजनिक प्रयोजनासाठी सदर जमीन संपादनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते.

त्याअर्थी, परिशिष्ट ३ मध्ये भूसंपादनामुळे विस्थापित कुटुंबासाठी प्रस्तावित जमीन संपादनाची माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्याअर्थी, परिशिष्ट ४ मध्ये सामाजिक आघात निर्धारणाबाबतची संक्षिप्त माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्याअर्थी, परिशिष्ट ५ मध्ये सदर कायद्याच्या कलम ४३ उप-कलम (१) अन्वये कामकाज पार पाडणाऱ्या प्रशासकाचा तपशील देण्यात आला आहे.

त्याअर्थी, सदर कायद्याच्या कलम ११ उप-कलम (४) अन्वये असे जाहीर करण्यात येते की, सदरची अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून सदर कायद्याच्या प्रकरण ४ मधील कार्यवाही पूर्ण होईल अशा वेळेपर्यंत कोणताही व्यवहार / हस्तांतर करणार नाही किंवा कोणताही व्यवहार / हस्तांतर करविणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसूचित केलेल्या जमिनीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोट-कलमाच्या अंमलबजावणीतून अशा जमीन मालकास सूट देऊ शकेल परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याद्वारे भरपाई करण्यात येणार नाही.

सदर कायद्याच्या कलम ११ चे उप-कलम (५) व भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ चे कलम १० उप नियम (३) अन्वये जिल्हाधिकारी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे भूमि अभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेईल.

आणि ज्याअर्थी, सदर कायद्याचे कलम ३ उप-कलम (ग) अन्वये जिल्हाधिकारी, रायगड हे समुचित शासन असल्याने उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १, उरण यांच्या वतीने कामे पार पाडण्यासाठी प्राधिकृत करीत आहे.

### परिशिष्ट १

**गावाचे नाव कळंबुसरे, ता. उरण, जि. रायगड**

| अ.क्र. (१) | स.नं. (२) | क्षेत्र (३) | अ.क्र. (१) | स.नं. (२) | क्षेत्र (३) | अ.क्र. (१) | स.नं. (२) | क्षेत्र (३) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३८/८/अ | ०-०५-९२ | २१ | १३/५ | ०-०१-१० | ४१ | ५/१/अ | |
| २ | ३८/३/अ | | २२ | १३/८/अ | ०-०३-३८ | ४२ | ५/१/ब | |
| ३ | ३८/३/ब | ०-१०-६२ | २३ | १३/८/ब | | ४३ | ५/२ | |
| ४ | ३८/३/क | | २४ | १३/७ | ०-०२-३१ | ४४ | ५/३/अ | |
| ५ | ३८/३/ड | | २५ | १३/६/अ | | ४५ | ५/३/ब | |
| ६ | ३८/६/ | ०-००-७१ | २६ | १३/६/ब | ०-०६-९० | ४६ | ५/४ | |
| ७ | ३८/५ | ०-००-९० | २७ | १३/१/अ | | ४७ | ५/६ | |
| ८ | ११/१ | | २८ | १३/१/ब | ०-१५-४३ | ४८ | ५/८ | ०-०८-०० |
| ९ | ११/२ | | २९ | ६/१ | | ४९ | ५/९ | |
| १० | ११/३ | | ३० | ६/२ | | ५० | ५/१० | |
| ११ | ११/४/अ | ०-२७-३६ | ३१ | ६/५ | | ५१ | ५/११/अ | |
| १२ | ११/४/ब | | ३२ | ६/६ | ०-००-११ | ५२ | ५/१३ | |
| १३ | ११/५/अ | | ३३ | ६/७/अ | | ५३ | ५/१४ | |
| १४ | १२/८ | ०-००-०३ | ३४ | ६/७/ब | | ५४ | ५/१५ | |
| १५ | १२/१/अ | | ३५ | ६/८ | | ५५ | ४/१ | |
| १६ | १२/१/ब | | ३६ | ८ | ०-०७-२२ | ५६ | ४/२ | ०-०४-०६ |
| १७ | १२/२ | | ३७ | ३/४ | ०-०१-२५ | ५७ | ४/३ | |
| १८ | १२/३ | ०-०४-२९ | ३८ | ३/३ | ०-०१-६४ | ५८ | १२२/२ | ०-१०-३९ |
| १९ | १२/४ | | ३९ | ३/१/अ | ०-०७-६७ | | **एकूण** | **१-१९-२९** |
| २० | १२/५ | | ४० | ३/१/ब | | | | |

### परिशिष्ट २

**प्रकल्पाचे नाव** :- मौजे कळंबुसरे, रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर- आवरे बाह्यवळण रस्त्यासाठी क्र.१/०० ते १/९०० मधील जमिनीचे संपादन

**प्रकल्पाचे विवरण** :- मौजे कळंबुसरे रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर-आवरे बाह्यवळण रस्त्यासाठी क्र.१/०० ते १/९०० मधील जमिनीचे संपादन

**सामाजिक फायदे.** :- मौजे कळंबुसरे, ता. उरण येथील जमीन रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर-आवरे बाह्यवळण रस्त्यासाठी क्र.१/०० ते १/९०० मधील जमिनीचे संपादन केल्याने व रस्त्याचे काम पूर्ण झाल्यावर चिरनेर ते आवरे येथील लोकांना ये जा करण्यासाठी सोईचे होणार आहे.

### परिशिष्ट ३

**पुनर्वसन विषयक बाबीचे विवरण :- निरंक**

### परिशिष्ट ४

**सामाजिक आघात निर्धारण अहवालाचा गोषवारा :-** महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ - अ दिनांक १३ जून २०२३ अन्वये भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम १० क द्वारे लोकहितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण २ आणि प्रकरण ३ च्या तरतुदी लागू करण्यापासून सूट दिली आहे.

### परिशिष्ट ५

**प्रशासक नियुक्तीचे विवरण :- निरंक**

सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याने कायद्याच्या कलम ११ चे उप-कलम (१) खाली अधिसूचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १, उरण यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

नोट :- प्रस्तुत जमिनीचा नकाशा पाहणीसाठी उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १, उरण यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

उरण,
दिनांक : ७ जुलै २०२३.

सही/-
**जनार्दन कासार,**
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),**
**मेट्रो सेंटर क्र. १, उरण**

**क्र. जिमाका/राअ/जाहि/६२/२०२३-२४**

# वडाळेसाठी नियमावली आवश्यक

## तलाव संरक्षणासाठी अभिषेक पटवर्धन यांची मनपा आयुक्तांकडे मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वडाळे तलावाच्या परिसरात येणाऱ्या नागरिकांसाठी नियमावली निश्चित करण्यात यावी, अशी मागणी भाजपच्या सांस्कृतिक सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन यांनी पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या संदर्भात त्यांनी माहितीस्तव आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनाही प्रत दिली आहे.

अभिषेक पटवर्धन यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पनवेल शहर हे पुरातन काळापासून तलावांचे शहर म्हणून ओळखले जाते. ह्याच बाबीचा विचार करून आपण पमपा क्षेत्रातील इतर तलावांसोबतच प्रमुख अश्या वडाळे तलावाचे नुकतेच सुशोभीकरण पूर्ण केले. ह्या बद्दल आपले मनापासून अभिनंदन व आभार. आपल्या ह्या कार्याने पनवेल शहराच्या सौंदर्यात भर पडत पनवेलच्या नागरिकांसाठी हक्काचे असे पर्यटन व विरंगुळा केंद्र तयार झाले आहे.

अनेक नागरिक हे तिथे व्यायामासाठी चालण्याकरीता, मोकळा फेर फटका मारण्याकरीता, आपल्या मित्र, नातेवाईकांसोबत वेळ घालवण्यासाठी तेथे येतात. सुंदर परिसर, रम्य वातावरण, समोर अथांग असे तळे पाहून पनवेलकर नागरिक हा मोकळा श्वास घेत सुखावत असतो, परंतु काही नागरिक हे त्याच परिसरात चुकीचे वागणूक करताना आढळून येतात. काही नागरिक तळ्यामधील माशांना खायला घालताना दिसून येतात. पाव, कणिक, बिस्किटे, कुरमुरे इत्यादी प्रकार हे तलावात टाकून तलाव अस्वच्छ होताना दिसून येत आहे. ह्या बाबत अनेकदा तेथील सुरक्षा रक्षकांनी व काही सुजाण नागरिकांनी थांबवून काही काळासाठी बदल होताना दिसून येतो, परंतु पुन्हा परिस्थिती जैसे थे असते त्यामुळे त्या भागात माश्यांना खायला घालू नये, तलावात अन्न पदार्थ टाकू नये असे कायम स्वरूपी फलक लावावेत व सुरक्षारक्षकांची संख्या वाढवून, तिथे दंडात्मक कार्यवाहीदेखील करावी.

संध्याकाळच्या वेळेत गर्दी जास्त असते. काही नागरिक हे स्वतःचे स्पीकर माईक वापरुन तिथे गाणी गात नाचताना दिसून येतात. काही मोजक्या लोकांच्या मनोरंजनसाठी इतर लोकांना याचा त्रास सहन करावा लागतो आहे. सुरक्षारक्षकांची संख्या वाढल्यास अश्या नागरिकांना थांबवता येईल तसेच पूर्व परवानगी शिवाय लाऊड स्पीकर चा वापरकेल्यास दंड व जप्तीची कार्यवाही करावी. काही वेळेस लहान-मोठी मुलं हे वकिंग ट्रॅकवर सायकल चालवताना आढळून येतात. तलावच्या सर्व प्रवेशाच्या ठिकाणी उभे रॉड लावून केवळ एक व्यक्ती आत चालत येऊ शकेल, अशी व्यवस्था असावी.

संपूर्ण परिसरात सीसीटीव्ही बसवावेत जेणे करून अमानुष व अनपेक्षित प्रकार होण्यापासून रोखता येतील. तलाव परिसरात कचरा पेटीची संख्या अगदीच कमी आहे. त्यामध्ये वाढ करावी तसेच तलाव परिसरात कचरा साठलेला दिसून आल्यास तेथील स्वच्छता अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांचा नंबर दर्शनी भागात लावावा. स्केट बोर्ड अथवा रोलर स्केट बोर्डचा वापर हा वॉकिंग ट्रॅक वर करू नये. ह्या व अश्या सूचनांचा एकत्रित फलक हा प्रमुख भागांत लावण्यात यावा व नियमावली निश्चित करावी, अशी मागणी या निवेदनात नमूद करण्यात आली आहे.

# सीकेटी महाविद्यालयात स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालयात महिला विकास कक्ष आणि महिला आणि बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने १० ते १२ जुलै या कालावधीत तीन दिवसीय राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यशाळेचे आणि समुपदेशन सत्राचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेचा उद्घाटन समारंभ सोमवारी समुपदेशनसत्राच्या माध्यमातून झाला. मंगळवार आणि बुधवार या दिवशी स्वसरंक्षण प्रशिक्षण देण्यात आले. या वेळी रायगडातील राजमाता जिजाऊ स्वसंरक्षण प्रशिक्षण केंद्राचे जिल्हा प्रमुख डॉ. महादेव शिंदे हे प्रशिक्षक लाभले. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, महिला विकास कक्ष प्रमुखडॉ. आर. डी. म्हात्रे उपस्थित होत्या.

### कार्यशाळा, समुपदेशन सत्राद्वारे मार्गदर्शन

*पहिल्या सत्रासाठी रायगडातील संस्कार भारती संस्थेच्या सदस्य ॲड. जुईली चव्हाण ह्या प्रमुख वक्त्या लाभल्या होत्या, या वेळी त्यांनी महिला व मुलींवरील हिंसाचार-संकल्पना व सद्यस्थिती या विषयावर व्याख्यान देऊन मुलींना हिंसाचाराची संकल्पना आणि हिंसाचाराचे विविध प्रकार आणि त्यापासून बचावाची तंत्रे याबाबत जागृत केले. तर दुसऱ्या सत्रासाठी बेलापूर येथील सायबर सेलचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन सारंग हे प्रमुख वक्ते लाभले होते, त्यांनी तंत्रज्ञान:महिला व मुलींसाठी असणारे धोके या विषयावर व्याख्यान देवून आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्वसरंक्षण कसे करावे याबद्दल मार्गदर्शन केले.*

या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी आजच्या काळातील महिलांना स्वसंरक्षण प्रशिक्षणाची गरज का आहे याबद्दल मार्गदर्शन केले. या वेळी विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देवून त्यांच्याकडून प्रात्यक्षिके करून घेण्यात आली. या कार्यक्रमात आभार महिला विकास कक्ष प्रमुख डॉ. आर. डी. म्हात्रे यांनी मानले. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील विविध विभागाच्या १८० विद्यार्थिनींनी उस्फूर्त सहभाग घेतला होता.

या कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, आय. क्यू.ए.सी.समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर यांनी कौतुक केले.तसेच महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविध विभागाचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापक वर्गाने याकार्यक्रमाचे यशस्वी आयोजनाबद्दल शुभेच्छा दिल्या. या कार्याकार्मांच्या यशस्वी आयोजनासाठीआणि महिला विकास कक्षाच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

## निवडक

### शामनाथ पुंडे नाट्य परिषद सदस्यपदी

**पनवेल :** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या प्रसिद्धी समितीवर मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे प्रमुख कार्यवाह



शामनाथ पुंडे यांची सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. परिषदेचे अध्यक्ष अभिनेते प्रशांत दामले, प्रमुख कार्यवाह अजित भुरे यांनी ही निवड केली आहे. या निवडीबद्दल पुंडे यांचे विविध स्तरातून अभिनंदन केले जात आहे. पुंडे यांचा सक्रिय सहभाग व परिषदेच्या कार्यासाठी आवश्यक आहे म्हणून शामनाथ पुंडे यांची समितीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ते अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे गेली दहा वर्षे नियामक मंडळ सदस्य असून पनवेल शाखेचे प्रमुख कार्यवाह आहेत.

### ‘रोटरी’ अध्यक्षपदी सुधीर चकोले

**पनवेल :** रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगरच्या २०२३-२४



या वर्षाकरीता सुधीर चकोले यांची निवड करण्यात आली. शीतल शाह यांच्या हस्ते त्यांनी आपली सूत्रे हातात घेतली. सीकेटी महाविद्यालयात झालेल्या या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून राम मोहन शिंदे, डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी अविनाश कोळी, प्रेसिडेंट रतन खरोल, योगीता देशमुख, बाळकृष्ण आंबेकर, आदित्य जोशी, रेश्मा कुरूप, दीपक खोत, अरुण खेडवल, धर्मराज मच्छिगर आदी उपस्थित होते.



**पनवेल : रेल्वे पोलीस ठाण्यामध्ये महिला दक्षता समितीची बैठक झाली. या बैठकीला समितीच्या दर्शना भोईर, सपना पाटील, अरुणा पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण पाडवी, आरपीएफ पनवेलचे ठाणा प्रभारी जसबिर राणा, आरती महाले, पोलीस अंमलदार, महिला सदस्य आदी उपस्थित होते.**

# भिंगारी येथे एसटीच्या धडकेने महिलेचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल जवळील भिंगारी येथील ब्रिजवर एसटीने दिलेल्या धडकेत एका महिलेचा जागीच मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि. १२) घडली आहे.

एसटी महामंडळाची बस खेडहून मुंबई येथे जात होती. दुपारी १२ च्या सुमारास एसटी भिंगारी येथील ब्रिज वरून पनवेलच्या दिशेने जात होती. त्यावेळी एक महिला ब्रिजवरून रस्ता ओलांडत असताना या बसची तिला धडक बसली. यामध्ये या महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे. या अपघाताची माहिती मिळताच पनवेल शहर ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तसेच पनवेल वाहतूक शाखेचे अधिकारी व पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल होत परिस्थितीतच आढावा घेत एसटी चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

# भाजप नेते विक्रांत पाटील यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा





**पनवेल : वार्ताहर**

भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश महासचिव तथा पनवेल महानगरपालिकेचे माजी उपमहापौर विक्रांत बाळासाहेब पाटील यांचा वाढदिवस बुधवारी (दि. १२) विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला.

वाढदिवसानिमित्त गोरगरीब गरजूंना धान्यवाटप, जेष्ठ नागरिकांना आधार छडीचे वाटप, विद्यार्थ्यांना शालेय वह्यांचे वाटप, आदिवासी वस्तीगृहाला डस्टबिन व आवश्यक वस्तूंचे वाटप, गतिमंद मुलांच्या आश्रमाला डस्टबिन व इतर स्वच्छता साहित्याचे वाटप, अनेक मंदिरांना डस्टबिन वाटप, रुग्णांना फळांचे वाटप, अनेक ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रम तसेच युवांसाठी फुटबॉल स्पर्धांचे आयोजन करून वाढदिवस साजरा करण्यात आला. त्याचप्रमाणे अनेक मान्यवरांनी त्यांच्या पनवेल येथील जनसेवा कार्यालयात भेट देऊन त्यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. तर अनेकांनी त्यांनी आवाहन केल्याप्रमाणे नोटबुक शुभेच्छा म्हणून भेट दिली. दरम्यान, वाढदिवसानिमित्त त्यांनी पनवेल शहर परिसरातील शिव मंदिर आणि बल्लाळेश्वर मंदिरात त्यांनी दर्शन घेतले आणि अभिषेक केला.

भारतीय जनता पार्टीच्या संपूर्ण राज्याचे महासचिव असल्याने केवळ पनवेलमध्येच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात त्यांचे हितचिंतक व कार्यकर्ते अनेक सामाजिक उपक्रम साकारण्यात आहेत. विक्रांत पाटील यांच्या आवाहनाप्रमाणे अनेकांनी नोट बुक भेट देऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# मोरबे रोडवर अपघात; तरुणाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

भरधाव टेम्पोने समोरून येणाऱ्या एका मोटरसायकलीस धडक दिल्याने झालेल्या अपघातात एक ठार एक जखमी झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील मोरबे रोडवरील निसर्ग ढाब्याच्या समोर घडली आहे.

टाटा ४०७ टेम्पो क्रमांक (एमएच ०४ जीएफ ४६३६)वरील चालक त्याच्या ताब्यातील टेम्पो भरधाव वेगाने तालुक्यातील मोरबे रोडवरील निसर्ग ढाब्याच्या समोरून जात असताना समोरून आलेल्या मोटारसायकलीस धडक दिल्याने झालेल्या अपघातात अक्षय कनवाळू (वय २७) हा गंभीर रित्या जखमी होऊन मयत झाला आहे. तर एक अनोळखी व्यक्ती जखमी झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# रामशेठ ठाकूर विद्यालयात लोकसंख्या दिनी विविध स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात मंगळवारी (दि. ११)जागतिक लोकसंख्या दिनाचे औचित्य साधून वादविवाद स्पर्धा तसेच वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाकरिता संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे आदींशी शुभेच्छा देत कौतुक केले.



# गव्हाण, न्हावे गावात चित्रकला स्पर्धा

## योगिता भगत यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप उलवे नोड २च्या महिला मोर्चा अध्यक्षा तसेच गव्हाण ग्रामपंचायतीच्या सदस्या योगिता भगत यांच्या वाढदिवसानिमित्त गव्हाण व न्हावे ग्रामपंचायत हद्दीतील सर्व रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये १०६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या स्पर्धेचे बक्षीस वितरण न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायीचे उपसरपंच विजय घरत, माजी पं. स. सदस्य हरभाऊ पाटील, म्हसेश्वर मंदिर कमिटीचे अध्यक्ष सी. एल. ठाकूर, जयवंत देशमुख, अनंता ठाकूर, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सदस्य उषा देशमुख, ज्ञानेश्वर कोळी यांच्यासह सर्व शिक्षक यांच्या हस्ते करण्यात आले.



**पनवेल : योगिता भगत यांनी उलवे सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात वृक्षारोपण केले. या वेळी संस्थेचे अध्यक्ष शेखर काशीद, सदस्य पल्लवी सुर्वे, आरएसएसच्या सदस्य रश्मी, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत आदी उपस्थित होते.**



# क्षयरुग्णांना पोषण आहाराचे वाटप

## दीपक फर्टिलायझर्स व पनवेल मनपाचा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रधानमंत्री क्षयरोग मुक्त भारत अभियानांतर्गत पनवेल महापालिकेने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत बुधवारी (दि. १२) कळंबोली नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र याठिकाणी क्षयरूग्णांना दीपक फर्टिलायझर्स ॲण्ड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन व ईशान्य फाऊंडेशन यांच्या वतीने महापालिकेच्या माध्यमातून पोषण आहार किटचे वाटप करण्यात आले.



या वेळी आयुक्त गणेश देशमुख, दीपक फर्टिलायझर्स प्रकल्प प्रमुख दिनेशप्रताप सिंह, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, दिपक फर्टिलायझर्सचे वरिष्ठ महाव्यवस्थापक किष्णात बेलेकर, सीएसआर फंडाचे सहाय्यक व्यवस्थापक संदीप काकडे, प्रकल्प समन्वयक योगेश पाटील, वैद्यकिय अधिकारी डॉ. अनिल पाटील, परिचारिका, कर्मचारी उपस्थित होते.

१३ जुलै रोजी खारघर येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये ५० क्षयरूग्णांना धान्य किटचे वाटप करण्यात येणार आहे. समाजातील विविध भागधारक जसे की विविध सामाजिक संस्था, निवडून आलेले प्रतिनिधी क्षय रूग्णांना सहाय्य करू शकतात. त्याचबरोबर कार्पोरेट कंपन्याही आपल्या व्यवसायिक सामाजिक जबाबदारी (सीएसआर) फंडातून क्षय रूग्णांना मदत करू शकतात. या कार्यक्रमांतर्गत निक्षय मित्र बनून त्यांच्या मार्फत क्षयरूग्णांना सहा महिने ते तीन वर्षासाठी कोरडा आहार पुरविण्यात येऊ शकतो.

### राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम

केंद्र शासनाने प्रधानमंत्री क्षयरोग मुक्त भारत अभियान सूरू केले असून, या कार्यक्रमांतर्गत पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात ‘निक्षय मित्र’ संकल्पना राबवत आहे. या अंतर्गत क्षयरूग्णांना सामुदायिक सहाय्य करण्याबाबत पालिकेच्यावतीने आवाहन करण्यात येत आहे. दिपक फर्टिलायझर्स ड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन व ईशान्य फाऊंडेशन यांच्यावतीने महापालिकेच्या माध्यमातून किटचे वाटप करून ते ‘निक्षय मित्र’ झाले आहेत.

## संपादकीय

# रखडलेल्या नियुक्त्या

सर्वोच्च न्यायालयाने १२ आमदारांच्या नियुक्तीला दिलेली स्थगिती आता उठवण्यात आली असून या संबंधातील एका याचिकाकर्त्याने आपली याचिका मागे घेतली आहे. त्यामुळे आता विधान परिषदेतील या नियुक्त्या लवकरात लवकर होतील, अशी अपेक्षा आहे.

**महाराष्ट्रात विधान परिषदेवरील १२ आमदारांच्या नियुक्तीचा रखडलेला प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या हस्तक्षेपामुळे आता मार्गी लागणार आहे. केवळ कुरघोडीच्या राजकारणापायी गेली तीन वर्षे या नियुक्त्या रखडल्या होत्या. २०२० मध्ये विधान परिषदेत सरकारतर्फे नियुक्त करण्यात आलेले १२ सदस्य निवृत्त झाले. त्यानंतर या जागा भरल्याच गेल्या नाहीत. दरम्यानच्या काळामध्ये दोन सरकारे आली. त्यापैकी एक तर गेलेदेखील, पण १२ आमदारांच्या नियुक्त्यांचा हा प्रश्न इकडून तिकडे टोलवला गेला. याच नियुक्त्यांच्या पायी तत्कालीन महामहीम राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना बरेच काही भोगावे लागले. तेव्हाच्या महाविकास आघाडीच्या सरकारने १२ आमदारांच्या नियुक्तीचा प्रश्न पूर्णत: राजकीय करून टाकला होता. हे सदस्य निवृत्त झाले त्याच्या काही महिने आधीच महाराष्ट्राच्या राजकीय रंगमंचावर नवे नेपथ्य उभे राहिले होते. जनमताचा सपशेल अव्हेर करून तेव्हाच्या शिवसेनेने थेट राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षाशी संधान बांधून सत्ता हस्तगत केली होती. राजकीय डावपेचात भारतीय जनता पक्षाचा विश्वासघात करून महाविकास आघाडीचे सरकार महाराष्ट्राच्या माथी बसले खरे, पण कारभार चालवण्यामध्ये ते पूर्णत: अपयशी ठरले. या सरकारचा कारभार किती दिव्य होता हे पुन्हा पुन्हा सांगण्याची गरज नाही. माननीय राज्यपालांनी सरकारच्या मनमानी निर्णयांवर शिक्का तेवढा उमटवावा, बाकी प्रश्न विचारू नयेत अशी त्या सरकारची अपेक्षा असावी. परंतु माननीय कोश्यारी यांनी आपले स्वतंत्र आणि घटनादत्त अधिकार राबवून सरकारच्या मनमानी कारभाराला अंकुश लावला. दरम्यान, विधानपरिषदेवर सरकारतर्फे नियुक्त करायच्या १२ सदस्यांची यादी मविआ सरकारने तयार केली आणि राज्यपालांकडे पाठवली. ही १२ नावे कोणाची होती आणि कशाप्रकारे यादीत समाविष्ट झाली होती हा स्वतंत्र विषय आहे. साहजिकच राज्यपाल महोदयांनी ती तशीच्या तशी स्वीकारणे अमान्य केले. यथावकाश हा विषय मुंबई उच्च न्यायालयात गेला. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयातही भिरभिरत राहिला. त्यामुळे विधान परिषदेच्या या १२ जागा प्रदीर्घ काळ रिक्त राहिल्या. ठाकरे सरकारने राज्यपालांशी सुसंवादच ठेवला नव्हता याचे एक उदाहरण म्हणून १२ आमदारांच्या प्रकरणाकडे बोट दाखवता येईल. मधल्या काळात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवरून खाली खेचले गेले आणि गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने ठाकरे सरकारने पाठवलेली यादी रद्दबातल करण्याविषयी एक प्रस्ताव राज्यपालांकडे पाठवला. तो मंजूर देखील झाला. दरम्यान, सारे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले होते. सर्वोच्च न्यायालयाने १२ आमदारांच्या नियुक्तीला स्थगिती दिल्याने काहीच करण्याजोगे उरले नव्हते. लोकप्रतिनिधीची कोणतीही जागा सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ रिक्त ठेवता येत नाही, तरीही केवळ कुरघोडीच्या राजकारणापायी महाराष्ट्रातील १२ आमदारांचे प्रकरण तीन वर्षे रखडले. लोकशाहीबद्दल उठताबसता गळा काढणाऱ्या महाविकास आघाडीच्या नेत्यांनी या विलंबाची जबाबदारी घ्यायला हवी. आता मात्र सरकारतर्फे १२ जणांची नवी यादी लवकरच जाहीर होईल किंवा राज्यपाल रमेश बैस यांच्याकडे पाठवली जाईल. या वेळी त्यात विलंब होणार नाही असे गतिमान सरकारच्या लौकिकावरून वाटते.**

# पोलादपूर तालुक्यातील सदनिकेचा प्रकल्प रखडला

**खबरबात**
**शैलेश पालकर**




पोलादपूर तालुक्यातील विविध भ्रष्टाचाराचे मनोरंजक किस्से पावसाळ्यात चहाचे घोट घेताना नाक्यानाक्यावर चर्चेत येत असतात, मात्र यासाठी भ्रष्टाचार घडून गेल्यानंतर त्याला जनतेमध्ये कोणी कसा किती फायदा करून घेतला, याबाबत चर्चा होत असते. यापैकी एका सरकारच्या आवास योजनेची सरमिसळ करून भामट्या भावंडांनी केलेल्या घोटाळ्याची सध्या दबक्या आवाजामध्ये चर्चा सुरू आहे.

म्हाडा आणि प्रधानमंत्री आवास योजनेच्या या घरांच्या लॉटरीची चर्चा घडविताना पोस्टरवर पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या फोटोचा वापर भामट्यांनी बिनबोभाटपणे केल्याने लोहारे येथे बालाजी रिसॉर्टसमध्ये आयोजित एका पत्रकार परिषदेमध्ये महाड विधानसभा मतदार संघाचे आमदार गोगावले, राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, प्रकल्पाचे प्रमुख संचालक हनुमंत सावंत, रामदास कळंबे आणि संदीप पालकर, नायब तहसीलदार शरद आडमुठे, निवडणूक नायब तहसिलदार समीर देसाई, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, नगरपंचायतीचे करनिरिक्षक महादेव सरबळे तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक लक्ष्मण मोरे आदी उपस्थित होते.

प्रकल्पाचे प्रमुख संचालक हनुमंत सावंत यांनी योजनेची माहिती देऊन साधारणत: साडेआठ लाखांमध्ये लाभार्थ्यांना स्वत:च्या मालकीचे घर केवळ दोन वर्षांमध्ये मिळणार असून दरमहा पाच हजार रूपये कर्जाचा हप्ता असलेल्या या कर्जप्रकरणात दोन लाख ६७ लाख रुपये अनुदान असून केंद्र व राज्य सरकार यांचे अनुक्रमे ४० व ६० टक्के अनुदानाचा भार उचलणार आहेत, अशी माहिती दिली. या वेळी राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे यांनी, या योजनेची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने होणार असल्याने देशातील कोणीही लाभार्थी या प्रकल्पाचा लाभ घेऊ शकणार असल्याचे सांगून या योजनेचे ऑफलाईन अर्ज नगरपंचायत तसेच नरवीर ग्रुपच्या कार्यालयामध्ये उपलब्ध होणार असल्याने लाभार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी सुरू होण्यापूर्वीच ऑफलाईन नोंदणी करीत आपल्या सदनिकेची नोंदणी करण्याचे आवाहन केले. भाषणाच्या ओघामध्ये योजनेची सत्यासत्यता लक्षात न घेताच मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गालगत पोलादपूर नगरपंचायत हद्दीतील पार्टेकोंड भागात ७२० सदनिकांचा प्रकल्प प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत उभारण्यात येणार असल्याने गरीबांसाठीच्या या नियोजित प्रकल्पासाठी सर्वतोपरी सहकार्य करू, अशी ग्वाही महाड विधानसभा मतदार संघाचे आमदार भरत गोगावले यांनी दिली.

या योजनेसाठी पोलादपूर नगरपंचायत हद्दीतील पार्टेकोंड येथील डोंगर उताराच्या जमिनीवरील लाल मातीचे मोठया प्रमाणात उत्खनन करण्यात येऊन मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या रस्ता दुभाजकावर वृक्षारोपण करण्यासाठी भराव टाकण्यासाठी वापरण्यात आले. यावेळी योजनेची माहिती देण्यासाठी उपस्थित राहणाऱ्यांपैकीच एका झोलर व्यक्तीने हा ठेका घेऊन शासनाला गौणखनिज उत्खननाची रॉयल्टी न भरताच म्हाडा आणि प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सदनिका उभारण्याच्या नियोजित प्रकल्पाच्या जमिनीवर मोठ्या प्रमाणात लालमातीचे उत्खनन केले आणि त्याठिकाणी सपाटीकरण झाल्यानंतर कबड्डी आणि क्रिकेट सारख्या क्रीडास्पर्धांचे आयोजन करून तालुक्याच्या नावलौकिकात भर टाकण्याचा प्रयत्न सुरू केला. या उदात्तीकरणाखाली गौणखनिज लालमातीचे उत्खननाची चर्चा विरून गेली. रस्त्याच्या दूतर्फा असलेली महाकाय वृक्षांची सावली नष्ट करून झाल्यानंतर रस्ता दुभाजकावर ४-६ इंच उंचीची झाडे रोपे लावण्याचा आणि पाणी न घालता मरत जगत झाडे वाढवायचा प्रयत्नदेखील याच मानसिकतेतून झाला. दुसरीकडे, म्हाडा आणि प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सदनिका उभारण्याच्या नियोजित प्रकल्पाच्या नावाने लॉटरीसदृश्य स्कीम ऑफलाईन पध्दतीने नावनोंदणी करण्याच्या बहाण्याने राबविण्यात आली आणि प्रत्यक्षात पोलादपूर नगरपंचायतीऐवजी नरवीर ग्रुपच्या कार्यालयामध्ये अर्ज उपलब्ध करण्यात आले.

यानंतर हजारो स्वत:चे घर इच्छिणाऱ्यांनी ऑफलाईन प्रत्येकी ठराविक रक्कम जमा करून अर्ज सादर केले. या अर्जांपैकी काही अर्जांची लॉटरीपध्दतीने लाभार्थी निवड करण्यात येऊन ऑनलाईन नोंदणी करण्याचे काम होणार होते, मात्र प्रत्यक्षात ही ऑफलाईन नोंदणी झाली नाहीच उलट सर्वच लाभार्थ्यांची फसवणूक होऊन फसविणारे तालुक्यातील मोठे लोकप्रतिनिधी असल्याने कोणीही तक्रार केली नाही. साधारणपणे जुलै २०२१ पासून सुरू झालेला हा उपक्रम वर्षअखेरपर्यंत बिनबोभाटपणे सुरू राहिल्याने लाखो रूपयांचा चुना जनतेला लावण्यात चार भावंडे यशस्वी झाली असल्याची चर्चा तालुक्यात होत आहे.

या प्रकारानंतर काही माहितीचा अधिकार कार्यकर्त्यांनी पोलादपूर नगरपंचायतीकडे माहितीचा अर्ज दाखल केल्यानंतर सदरच्या योजनेचा नगरपंचायतीचा काहीही संबंध नसून लोकप्रतिनिधी उपस्थित असल्याने पोलादपूर नगरपंचायत हद्दीत सदरचा उपक्रम राबविला जाणार असल्याने नगरपंचायतीचे अधिकारी उपस्थित होते, असे स्पष्ट करण्यात आले आहे. याचप्रकारे, तहसिल कार्यालयाचे उत्तर प्राप्त झाले असून अन्य जनसेवकांना लोकप्रतिनिधी होते म्हणून आलो आणि योजना कशाप्रकारची होती. आम्हास माहिती नाही, असे सांगून कानावर हात ठेवण्याची इच्छा झाली.

पोलादपूर तालुक्यातील या बहुचर्चित चार भावडांपैकी एक भाऊ राजकारणात तर दुसरा दोन नंबर धंद्यांमध्ये समाजसेवक म्हणून सक्रीय असल्यानेच हे साध्य झाल्याचे फसविले गेलेल्यांचे म्हणणे आहे. याखेरिज, आणखी दोन भावांपैकी एक भाऊ समाजकारण तर दुसरा 'आते जाते हुवे मैं सबपे नजर रखता हूँ... अशी भुमिका घेऊन तालुकाभर फिरस्ता असल्याचा अनुभव सर्वांनीच घेतला आहे. कधी महामार्गावरून कोकणात जाणाऱ्या रासायनिक टँकरमधील केमिकल आणि ऑईल चोरी तर कधी स्टील वाहून नेणाऱ्या ट्रकमधून स्टीलची चोरी आदी व्यवसाय करणाऱ्यांनी नदीमध्ये रिव्हर राफ्टींग आणि डोंगरदऱ्यांमध्ये रॉक क्लायम्बिंग तसेच रेस्क्यू टीमदेखील सुरू करून समाजसेवेच्या ऐतिहासिक नावाखाली सुरू झालेली बिनदिक्कत समाजसेवा रस्ते बांधकाम आणि विविध योजनांच्या अपहारापर्यंत दिसून आली. विविध प्रकारचे उपक्रम राबवित पोलादपूरवासियांची फसवणूक करणाऱ्यांना मोठया प्रमाणात मतदान होत असल्याची कपाळाला हात मारून चर्चा सुरू झाल्यानंतर 'म्होरल्या वरशाला बगू!' एवढाच निर्धार व्यक्त होत आहे.

## बदलते तंत्रज्ञान

### रात्रभर मोबाईल वापरण्याची सवय सेटींग बदलून थांबवा!



सध्याच युग हे डिजिटल युग आहे, मोबाईल वापरणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. बरेच वापरकर्ते रात्री फोन बाजूला ठेवतात आणि झोपायला जातात. पण फोन व्हायब्रेट होताच ते फोन उचलतात आणि पुन्हा वापरायला लागतात. ही समस्या खूप सामान्य आहे आणि यापासून सुटका मिळवण्यासाठी आम्ही तुम्हाला Android फोनच्या काही सेटिंग्ज सांगत आहोत ज्या तुम्ही लगेच कराव्यात.

आपण रात्री मोबाईल वापरत असताना असणारी ब्लू लाईट हानिकारक आहे, हा प्रकाश झोप न येण्याचे महत्वाचे कारण आहे. हा प्रकाश मेलाटोनिन ला ब्लॉक करते. यामुळे आपल्याला झोप येते. या समस्येला संपवण्यासाठी एन्ड्रॉइड ७ मध्ये Night Light फिचर दिले आहे. यात ब्लू लाईट कमी केली जाते. जेव्हा हा प्रकाश कमी होतो तेव्हा फोनचा वापर केल्यानंतरही झेप येण्याची शक्यता आहे.

हे फीचर चालू करण्यासाठी तुम्हाला सेटिंगमध्ये जावे लागेल. नंतर डिस्प्ले आणि ब्राइटनेस वर टॅप करा. नंतर नाईट लाइट वर जा आणि रीडिंग मोड चालू करा. येथे तुम्हाला Set screen colors वर जाऊन Warmer वर टॅप करावे लागेल.

जर तुम्ही युट्युब जास्त वापरात असाल तर तुम्हाला रिमाइंडर लावाला लागेल. यामुळे तुम्ही किती उशीर युट्युब वापरले याची माहिती मिळेल. यासाठी सेटिंगमध्ये जा आणि त्यानंतर जनरल वर टॅप करा. यानंतर, Remind me when it's bedtime हे टॉगल चालू करा. येथून तुम्ही तुमची झोपण्याची वेळ सेट करू शकता.

डिजिटल वेलबीइंग हे स्क्रीन वेळ कमी करण्यात मदत करण्यासाठी डिझाइन केलेले साधन आहे. यामध्ये बेडटाइम मोड देण्यात आला आहे. हे वैशिष्ट्य कॉल आणि सूचनांसाठी आपोआप डू नॉट डिस्टर्ब चालू करते. तसेच स्क्रीन काळा आणि पांढरा करते. यासाठी तुम्हाला सेटिंगमध्ये जावे लागेल. त्यानंतर डिजिटल वेलबीइंग आणि पॅरेंटल कंट्रोलवर जाऊन बेडटाइम मोड सुरू करावा लागेल.

# प्रसिद्ध मराठी कवी इंदिरा संत



**निमित्त**

प्रसिद्ध मराठी भावकवयित्री इंदिरा संत यांचा आज स्मृतिदिन. त्यांचा जन्म ४ जानेवारी १९१४ रोजी इंडी (जि. विजापूर, कर्नाटक) येथे झाला. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव इंदिरा दीक्षित. त्यांचे शिक्षण बेळगाव, कोल्हापूर व पुणे येथे बीएबीटीपर्यंत झाले. मराठी आणि मानसशास्त्र ह्या विषयांच्या अध्यापिका म्हणून तसेच बेळगाव येथील मराठी ट्रेनिंग कॉलेजच्या प्राचार्य म्हणून त्यांनी काम केले.

बालपणापासून इंदिरा यांना लेखनाची आवड होती. कुटुंबातूनच घडलेले स्त्रीगीतांचे व ओव्यांचे संस्कार त्यांच्यातील कवयित्री घडताना उपयुक्त ठरले. १९३२ सालापासून त्या जाणीवपूर्वक लेखन करू लागल्या. लघुनिबंधकार ना. मा. संत यांच्याशी त्यांचा फर्ग्युसन महाविद्यालयात शिकत असताना परिचय झाला आणि त्याची परिणती विवाहात झाली. या दाम्पत्याच्या कविता सहवास (१९४१) या नावाने प्रसिद्ध झाल्या. बालकवी, माधव जूलियन्, अनिल आणि अनंत काणेकर यांचा प्रभाव या संग्रहातील कवितांतून जाणवतो. पुढे पतीच्या अकाली निधनानंतर एकलेपणाची तरल, अंतर्मुख भाववृत्ती घेऊन त्यांची कविता वेगळ्या रूपाने बहरली. जीवनातील स्वास्थ्यापेक्षा संघर्षावर श्रद्धा असणाऱ्या इंदिराबाईंनी लिहिलेली भावकविता ही मराठी साहित्याला लाभलेली अनमोल देणगी आहे. स्वानुभवाचा संयत, पण रेखीव आविष्कार हे त्यांच्या कवितेचे लक्षणीय वैशिष्ट्य होय. स्वत:ची सुखदु:खे, प्रक्षोभ, कुंठितावस्थाचित्रित करताना लवलवत्या प्रतिमासृष्टीला आकार देण्याचे सामर्थ्य त्यांच्या प्रतिभेत असल्यामुळे त्यांच्या सर्व संग्रहांतील कविता भावकाव्याचा निरामय ठसा रसिक मनावर उमटवितात तसेच त्यातून एका प्रदीर्घ काव्यप्रवासाची भावकहाणीही प्रकटत जाते.


भूतकाळाच्या जाणिवेला सतत वर्तमानकाळात आविष्कृत करणे हे इंदिरा संत यांच्या कवितेचे खास वैशिष्ट्य म्हणावे लागेल. स्त्रीसुलभ साधेपणा, स्वाभाविकता, प्रांजलपणा आणि एक अखंड संवादलय ही त्यांच्या कवितेची अन्य उल्लेखनीय वैशिष्ट्ये होत.

ओवीसदृश अशी रचनापद्धती स्वाभाविक ढंगाने त्या उपयोजितात. त्यांच्या मुक्तकांनाही अंतर्गत बंदिशीचा व ठसकेबाजपणाचा डौल असतो. त्यामुळे वरवर सोपी दिसणारी त्यांची कविता अनुकरणाला अवघड जाते. इंदिराबाईंना अनेक मानसन्मान लाभले. रसिकांच्या प्रेमाबरोबर राजमान्यता लाभली.

शेला, मेंदी व रंगबावरी या काव्यसंग्रहांना राज्य शासनाचे वाङ्मयीन पुरस्कार लाभले तसेच गर्भरेशमी या काव्यसंग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला (१९८४). नासिकच्या कुसुमागज प्रतिष्ठानने त्यांना 'जनस्थान' पुरस्कार देऊन सन्मानित केले (१९९५). महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने त्यांना गौरववृत्ती दिली होती. त्यांची राहणी अगदी साधी होती. अखेरची १४ वर्षे त्यांचे बेळगावमध्ये वास्तव्य होते. वृद्धापकाळाने त्यांचे बेळगाव येथे निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**रोहा : तालुक्यातील शेतीचे ड्रोनद्वारे घेण्यात आलेले छायाचित्र.** (छाया : राधाकृष्ण म्हापसेकर)

## आरोग्य प्रहर

### मधुमेह नियंत्रणासाठी दररोज 'इतके' तास झोपा!



हृदयविकार आणि कर्करोगाप्रमाणेच मधुमेहाच्या रुग्णांमध्येही देशात दरवर्षी वाढ होताना दिसत आहे. हा रोग होण्यामागे अनेक कारणे आहेत. खराब अन्न, विस्कळीत जीवनशैली आणि अनुवांशिक समस्या या गोष्टी त्यासाठी कारणीभूत ठरतात. पण झोपेची कमतरता देखील तुम्हाला मधुमेहाचे रुग्ण बनवू शकते हे तुम्हाला माहीत आहे का ? डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, ज्या लोकांना रोज चांगली झोप लागते, त्यांच्या रक्तातील साखर नियंत्रणात राहते. या विषयावर संशोधनही करण्यात आले आहे.

कॅलिफोर्निया विद्यापीठात ५०० लोकांच्या झोपण्याच्या पद्धतीवर संशोधन करण्यात आले आहे. त्यामध्ये असे आढळून आले की जे लोक रोज आठ तास झोप घेतात, त्यांच्या शरीरात पॅरा सिंथेटिक खूप सक्रिय राहते. त्याच्या सक्रियतेमुळे, साखरेची पातळी ठीक राहते आणि आपल्या शरीराचे संतुलन राखण्यास देखील मदत होत असते. या संशोधनात असेही दिसून आले की जे लोक चांगली झोप घेतात, त्यांच्या झोपतात शरीरातील इन्सुलिनची प्रतिक्रिया देखील वाढते. त्यामुळे शरीरातील ग्लुकोजची पातळी नियंत्रणात राहते आणि शुगर लेव्हल वाढत नाही. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने दररोज कमीत कमी आठ तासांची झोप घेतली पाहिजे.

ज्येष्ठ डॉक्टरांच्या सांगण्यानुसार, चांगली झोप येण्यासाठी चांगली जीवनशैली असणेही खूप महत्वाचे आहे. त्यासाठी तुम्ही रोजच्या दिनचर्येत व्यायामाचा समावेश केला पाहिजे. दिवसभरात कमीत कमी १५ मिनिटे तरीय व्यायाम करण्याचा प्रयत्न प्रत्येक व्यक्तीने केला पाहिजे. असे केल्याने शरीर तंदुरुस्त राहते आणि तुम्हाला रात्री चांगली झोपही लागते. त्यामुळे साखरेची पातळीही नियंत्रणात राहील आणि मधुमेहाचा धोकाही कमी होईल.

चांगल्या लाइफस्टाइलसोबतच जेवणही चांगल्या झोपेसाठी महत्त्वाची भूमिका बजावते. यासाठी रात्री जास्त अगदी पोटभर न जेवण्याचा प्रयत्न करा. रात्री चहा किंवा कॉफीचे सेवन करणे टाळा. झोपण्याच्या किमान दोन तास आधी रात्रीचे जेवण करावे. तसेच जेवल्यानंतर लगेचच झोपू नका. थोडा वेळ चालावे.

RNI No. MAHBIL /2009/36619

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ९, अंक ४८] गुरुवार, जुलै ६, २०२३/आषाढ १५, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ७२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**जिल्हाधिकारी, रायगड यांजकडून**

**अधिसूचना**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक भूसंपादन/टें-८/एस.आर. नं.२९/२०१९/पारगावडुंगी/२०२३.—ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना, दि. १४ जुलै २०२१ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्र. १, पनवेल यास पदनिर्देशित करीत आहे.



**अनुसूची - एक**

**जमिनीचे वर्णन**

गाव - मौजे पारगावडुंगी, ता. पनवेल, जि. रायगड

**नवी मुंबई प्रकल्प तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व तदनुषंगिक कामाकरिता भूसंपादन**

| अ.क्र. (१) | भूमापन किंवा गट क्रमांक (२) | अंदाजित क्षेत्र (हेक्टर. आर मध्ये) (३) |
|---|---|---|
| १ | २ | ०-१३-०० |
| २ | ३७/२५ | ०-०१-७० |
| ३ | ३७/२६ | ०-१८-१० |
| ४ | ४०/९ | ०-३१-६० |
| | **एकूण** | **०-६४-४०** |

**अनुसूची - दोन**

**(सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण)**

**प्रकल्पाचे नाव** :- नवी मुंबई प्रकल्प तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व तद्नुषंगिक कामाकरिता.

**प्रकल्प कार्याचे वर्णन** :- मौजे पारगावडुंगी, ता.पनवेल येथील नवी मुंबई प्रकल्पांतर्गत विकास कार्यासाठी आवश्यक आहे.

**समाजाला मिळणारे लाभ** :- नवी मुंबई शहराचे औद्योगिक महत्त्व वाढते नागरीकरण व पर्यटन वाढते महत्त्व लक्षात घेता येत्या दशकात नवी मुंबई शहराचा विकास आणि विस्तार वेगाने होईल.

**अनुसूची - तीन**

**(पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन)**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे.** :- प्रस्तावित जमिनीच्या भूसंपादनामुळे गावातील ०६ कुटुंबे विस्थापित होत आहेत.

**अनुसूची - चार**

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

मौजे पारगावडुंगी, ता. पनवेल येथील सर्व्हे नं./हिस्सा नं. २, ३७/२५, ३७/२६, ४०/९ एकूण क्षेत्र ०.६४.४० हे.आर ही जमीन नवी मुंबई प्रकल्पासाठी आवश्यक असून सदर जमिनीचे भूसंपादन प्रस्तावित आहे. सदर भूसंपादन शहर व औद्योगिक विकास महामंडळ, अर्थात सिडकोकरिता नवीन भूसंपादन कायद्यांतर्गत शहरीकरण व संदर्भिय विकास या सामाजिक प्रयोजनासाठी करण्यात येत आहे.

नवी मुंबई हे शहर मुंबईची गर्दी कमी करण्याचे साधन राहिले नसून एक आकर्षण केंद्र बनले आहे. नवी मुंबईचा अंतर्भाव आता स्मार्ट सिटीच्या यादीमध्ये झाला आहे. यामुळे नवी मुंबई प्रकल्पाचा विस्तार नवीन टप्प्यावर पोचला आहे.

तंत्रज्ञानावर आधारित स्मार्ट सिटीच्या निर्माणाकरिता अनेक नवीन सोयीसुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे. स्मार्ट सिटी योजनेत पनवेलच्या आसपासच्या गावांचा विकास करण्याची योजना आहे. यामध्ये कोपर, ओवळे, पारगावडुंगी, वहाळ इत्यादी गावांचा समावेश होतो. नवी मुंबई प्रकल्पाचा विस्तार व समग्र विकासाकरिता प्रस्तावित जमिनीची आवश्यकता आहे. सिडकोमार्फत या जमिनीचा वापर विकासकामांकरिता व नागरी सुविधांसाठी होणार असून त्याचा लाभ सामान्य नागरिकांना होणार आहे.

पारगावडुंगी गाव हे पनवेल पासून केवळ १० कि.मी. अंतरावर आहे. या गावाची बरीच जमीन नवी मुंबई प्रकल्पाकरिता १९७२ सालापासून संपादित करण्यात आली आहे. गावठाण व लोकवस्ती पूर्वीप्रमाणेच असून सध्या ७० च्या वर घरे आहेत. आजूबाजूला वेगाने नागरीकरण झाल्यामुळे शेती व्यवसाय पूर्वीच बंद पडला आहे. नागरिक विविध व्यवसाय व नोकरीधंद्यामध्ये गुंतलेले दिसतात.

अलिबाग,
दिनांक ५ जुलै २०२३.

**डॉ. योगेश म्हसे,**
जिल्हाधिकारी, रायगड.

RNI No. MAHBIL /2009/36619

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ९, अंक ४८(२)] गुरुवार, जुलै ६, २०२३/आषाढ १५, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ७३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**जिल्हाधिकारी, रायगड यांजकडून**

**अधिसूचना**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३.**

क्रमांक भूसं/टे-८/एस.आर. २७/२०१९/कोपर/२०२३.—ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने,

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना, दिनांक १४ जुलै २०२१ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्र. १ पनवेल यास पदनिर्देशित करीत आहे.



**अनुसूची - एक**

**जमिनीचे वर्णन**

गाव मौजे कोपर, ता. पनवेल, जि. रायगड

नवी मुंबई प्रकल्प तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व तदानुषंगिक कामाकरिता भूसंपादन

| अ.क्र. (१) | भूमापन किंवा गट क्रमांक (२) | अंदाजित क्षेत्र (हेक्टर. आर मध्ये) (३) |
|---|---|---|
| १ | २९/२ | ०-२१-०० |
| २ | २९/३ | ०-३१-१० |
| ३ | २४/४अ | ०-१२-०० |
| | **एकूण** | **०-६४-१०** |

**अनुसूची - दोन**

**(सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण)**

**प्रकल्पाचे नाव** : नवी मुंबई प्रकल्प तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व तदानुषंगिक कामाकरिता

**प्रकल्प कार्याचे वर्णन** : मौजे कोपर, ता. पनवेल येथील नवी मुंबई प्रकल्पांतर्गत विकास कार्यासाठी आवश्यक आहे.

**समाजाला मिळणारे लाभ** : नवी मुंबई शहराचे औद्योगिकीकरणाचे महत्त्व, वाढते नागरीकरण व पर्यटनाचे महत्त्व वाढते हे लक्षात घेता येत्या दशकात नवी मुंबई शहराचा विकास आणि विस्तार वेगाने होईल.

**अनुसूची - तीन**

**(पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन)**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :** प्रस्तावित जमिनीच्या भूसंपादनामुळे १ खातेदार विस्थापित होईल.

**अनुसूची - चार**

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

मौजे कोपर, ता. पनवेल येथील सर्व्हे नं./हिस्सा नं. २९/२, २९/३, २४/४ अ एकूण क्षेत्र ०.६४.१० हे.आर. ही जमीन नवी मुंबई प्रकल्पासाठी आवश्यक असून सदर जमीनीचे भूसंपादन प्रस्तावित आहे. सदर भूसंपादन शहर व औद्योगिक विकास महामंडळ, अर्थात सिडकोकरिता नवीन भूसंपादन कायद्यांतर्गत शहरीकरण व संदर्भिय विकास या सामाजिक प्रयोजनासाठी करण्यात येत आहे.

नवी मुंबई हे शहर मुंबईची गर्दी कमी करण्याचे साधन राहिले नसून एक आकर्षण केंद्र बनले आहे. नवी मुंबईचा अंतर्भाव आता स्मार्ट सिटीच्या यादीमध्ये झाला आहे. यामुळे नवी मुंबई प्रकल्पाचा विस्तार नवीन टप्प्यावर पोचला आहे.

तंत्रज्ञानावर आधारित स्मार्ट सिटीच्या निर्माणाकरिता अनेक नवीन सोयीसुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे. स्मार्ट सिटी योजनेत पनवेलच्या आसपासच्या गावांचा विकास करण्याची योजना आहे. यामध्ये कोपर, ओवळे, पारगावडुंगी, वहाळ इत्यादी गावांचा समावेश होतो. नवी मुंबई प्रकल्पाचा विस्तार व समग्र विकासाकरिता प्रस्तावित जमिनीची आवश्यकता आहे. सिडको मार्फत या जमिनीचा वापर विकासकामांकरिता व नागरी सुविधांसाठी होणार असून त्याचा लाभ सामान्य नागरिकांना होणार आहे.

कोपर गाव हे पनवेल पासून केवळ ७ कि.मी. अंतरावर आहे. या गावाची बरीच जमीन नवी मुंबई प्रकल्पाकरिता १९७२ सालापासून संपादीत करण्यात आली आहे. गावठाण व लोकवस्ती पूर्वीप्रमाणेच असून सध्या ३२८ च्या वर घरे आहेत. आजूबाजूला वेगाने नागरीकरण झाल्यामुळे शेती व्यवसाय पूर्वीच बंद पडला आहे. नागरिक विविध व्यवसाय व नोकरीधंद्यामध्ये गुंतलेले दिसतात.

अलिबाग,
दिनांक ५ जुलै २०२३.

**डॉ. योगेश म्हसे,**
जिल्हाधिकारी, रायगड.

RNI No. MAHBIL /2009/36619

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ९, अंक ४७] बुधवार, जुलै ५, २०२३/आषाढ १४, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ६९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**जिल्हाधिकारी, रायगड यांजकडून**

**अधिसूचना**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक भूसं/टे-८/एस.आर ३१/२०१९/माणघर/२०२३.— ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना, दिनांक १४ जुलै २०२१ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्र. १ पनवेल यास पदनिर्देशित करीत आहे.

पान ७ वर...

## निवडक

### खाणीत बुडून तरुणाचा मृत्यू

**उरण :** बेलपाडा येथील आक्सा दगड खाण परिसरात रविवारी पोहण्यासाठी गेलेल्या जासईमधील १९ वर्षीय तरुणाचा बुडून मृत्यू झाला आहे. या संदर्भात न्हावा-शेवा पोलीस ठाण्याचे पोलीस अधिक तपास करीत आहेत. जासईमधील काही तरुण गावाशेजारीच असलेल्या बेलपाडा परिसरातील आक्सा दगड खाणीच्या तलावात पोहण्यासाठी गेले होते. यातील सिद्धेश घरत (वय १९) हा तरुण तलावाबाहेर न आल्याने त्याचा शोध सुरू करण्यात आला. यासाठी न्हावा-शेवा पोलीस तसेच सिडकोच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी प्रयत्न केले. अखेरीस तीन तासांच्या प्रयत्नाने त्याचा मृतदेह आढळून आला.

### कोकणात अल्प पावसाची नोंद

**नवी मुंबई :** कोकण विभागात दि.१२ जुलै २०२३ रोजी सरासरी ०७.४ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक पावसाची नोंद पालघर जिल्हयात २०.९मि.मी. झाली आहे. कोकण विभागात आत्तापर्यंत एकूण ४७२.१ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. ठाणे-०५.४मि.मी.,पालघर- २०.९मि.मी, रायगड-०४.४मि.मी., रत्नागिरी-०४.५ मि.मी., सिंधुदुर्ग-०६.८मि.मी, अशी जिल्हानिहाय पावसाची आकडेवारी आहे.

### रोटरी क्लब ऑफ पनवेलचा पदग्रहण सोहळा

**पनवेल :** रोटरी क्लब ऑफ पनवेलचा पदग्रहण सोहळा नुकताच उत्साहात झाला. यामध्ये अध्यक्षपदी राजेंद्र मोरे यांनी सूत्रे हाती घेतली तसेच क्लबच्या सचिवपदी सतीश पावसे यांची निवड करण्यात आली. याबद्दल मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. आगामी काळात नद्यांचे पुनरुज्जीवन, वृद्धाश्रम, आरोग्य जनजागृती, शिक्षण क्षेत्रात विविध समाज उपयोगी प्रकल्प, अंगणवाडी, रोजगानिर्मिती तसेच पर्यावरण पूरक उपक्रम हाती घेतले जाणार आहेत, असे अध्यक्ष राजेंद्र मोरे यांनी सांगितले. पदग्रहण सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून भावी प्रांतपाल संतोष मराठे आणि सहायक प्रांतपाल ऋतुजा भोसले, आणि क्लबचे मान्यवर सदस्य आदी उपस्थित होते.



# गढूळ पाणीपुरवठ्याने नागरिक त्रस्त

## नेरूळ, जुईनगर येथील प्रकार; रहिवासी संतप्त

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ- जुईनगर विभागातील नागरिकांना बुधवारी गढूळ पाण्याचा पुरवठा झाल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. पिवळसर दूषित पाण्याच्या पुरवठ्याने विशेषत लहान मुले वृद्धांच्या आजाराला निमंत्रण मिळत असल्याने रहिवाश्यांनी सकाळचे पिण्याचे पाणी भरले नाही.



पावसाळयाच्या दिवसात पिवळसर गढूळ पाण्यामुळे अनेक घरांमधील लोक लहान मुले महिला आजारी पडत आहेत. या अगोदरदेखील नवी मुंबई मनपा आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या निदर्शनास स्थानिक जागरूक राजकारणी यांनी आणून दिली होती. तात्पुरत्या स्वरूपात समस्येचे निवारण देखील झाले होते, मात्र पुन्हा पिवळसर घडूल पाण्याचा पुरवठा बुधवारी सकाळी झाल्यामुळे नागरिक हैराण झाले आहे.

जुईनगर, नेरूळ विभागातील दूषित पाण्याचा वारंवार होणाऱ्या पुरवठ्यामुळे नागरिकांनी पालिकेच्या कामावर नारागी व्यक्त केली आहे. नेरूळ आणि जुईनगर नोड परिसरात पाणीपुरवठा विभागाकडून मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पिवळसर स्वरूपातील दूषित पाण्याचा पुरवठा होवू लागला होता.

पाणी गाळून, उकळून जरी प्यावे लागत असले तरी उकळल्यानंतरही पाण्याचा पिवळसरपणा राहत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.

> **नेरूळ, जुईनगरमधील काही भागात दूषित पाण्याची समस्या ही वारंवार होत असल्यामुळे पालिका प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे या दूषित पाण्यामुळे एखाद्याचा जीवदेखील जाऊ शकतो याची जबाबदारी पालिका घेणार का? दूषित पाण्याच्या पुरवठ्याची समस्या पावसाळ्यात निर्माण होणे म्हणजे साथीच्या आजाराचा आमंत्रण देणे असून पाणी पुरवठा विभागाने तत्काळ लक्ष द्यावे.**
>
> **-सुहासिनी नायडू, अध्यक्ष, भाजप नवी मुंबई युवती मोर्चा**

> **जुईनगर, नेरूळ विभागातील दूषित पाण्यामुळे एकाद्या व्यक्तीचा जीव जाऊ शकतो. एखाद्या व्यक्तीच्या जीव गेल्यावरच पालिका प्रशासनाला जाग येणार का? पालिकेचे सर्व प्रकारचे नियम पाळतो, कर भरतो त्याचा मोबदला पालिका असा देते का?**
>
> **-नेत्रा राऊत,** गृहिणी

> गेली अनेक महिन्यांपासून दूषित पाण्याचा पुरवठा हा विषय भयानक झाला आहे. मनपाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कल्पना असून पण दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे आयुक्तांनी तत्काळ तोडगा न काढता कायमस्वरूपी तोडगा काढणे गरजेचे आहे.
>
> **-वंदना डांगे, गृहिणी**

> **या पिवळसर स्वरूपातील दूषित पाण्यामुळे रोगराई पसरण्याचा पर्यायाने जिविताला धोका निर्माण होण्याची भीती असून पुन्हा दूषित पाणीपुरवठा झाल्याने नागरिक संतप्त झाले आहेत.**
>
> **-उज्वला काटे, गृहिणी**

(छाया : सलीम शेख)



**पनवेल : भाजपचे प्रदेश सरचिटणीस तथा माजी उपमहापौर विक्रांत पाटील यांना वाढदिवसानिमित्त भाजप मानवाधिकार प्रदेश सेक्रेटरी यशोधरा गोडबोले यांनी शुभेच्छा दिल्या.**

# पनवेल प्रभाग समिती 'ब'साठी रुग्णवाहिका व शववाहिनी द्या

## माजी सभापती प्रमिला पाटील यांनी महापालिकेकडे मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीतील प्रभाग समिती ब करीता रुग्णवाहिका व शववाहिनी मिळण्याबाबत माजी प्रभाग समिती ब सभापती प्रमिला पाटील यांनी पनवेल मनपा आयुक्तांकडे पत्रव्यवहार केला आहे.

प्रमिला पाटील यांनी निवेदनामध्ये म्हटले आहे की, प्रभाग समिती व अंतर्गत कळंबोली खांदा कॉलनी आसुडगाव, टेंगोडे,




वळवली इतर शहरी व ग्रामीण भाग येतो. या भागात सर्वसामान्य लोक राहतात, त्यातील बहुतेक लोक मोल मजुरी वसेच हातावर पोट असणारे आहेत. त्यांना अत्यावश्यक काळात खासगी रूग्णवाहिका परवडत नाहीत तसेच रूग्णवाहिका रात्रीच्या वेळी अव्वाच्यासव्वा रक्कम भाडे स्वरूपात मागतात. त्या सर्वसामान्य नागरिकांना परवडत नाहीत त्यासाठी आपण महापालिकेच्या माध्यमातून रुग्णवाहिका उपलब्ध करून द्यावी जेणेकरून सर्वसामान्यांना दिलासा मिळेल.

मयत व्यक्तीला घरापासून ते स्मशानापर्यंत मयत व्यक्तीला नेण्यासाठी शववाहीनी आवश्यकता असते. घर ते स्मशानभुगी २ ते ३ किंवा त्यापासुन जास्त अंतर असते. पावसाळयात जास्त अडचण निर्माण होते त्याकरिता महापालिकेच्या माध्यमातुन शववाहीनी मिळाल्या तर सर्वसामान्यांसाठी दिलासादायक राहील. महापालिकेच्या माध्यामातून प्रभाग समिती व करिता रूग्णवाहिका तसेच शववाहिनी मिळावी.

# पनवेल उपजिल्हा रुग्णालयात कर्मचाऱ्यांचे आंदोलन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलच्या डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात कंत्राटी कुशल व कुशल कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन सुरू झाले आहे. थकीत वेतन त्वरित करण्याबाबत जोपर्यंत लेखी हमी मिळत नाही तोपर्यंत काम बंद आंदोलन चालूच राहील, असा इशारा कर्मचाऱ्यांच्यावतीने देण्यात आला आहे.



फोकस फ्यॉसिलिटी व सिक्युरिटी लिमिटेड या ठेकेदारामार्फत रुग्णालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा एप्रिल २०२३ व मे २०२३ या महिन्यांचा पगार थकीत असल्यामुळे कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. करार संपलेला असतानासुद्धा मागील दोन महिन्यांपासून कर्मचारी आजतागायत काम करत आहेत, परंतु कर्मचाऱ्यांना कोणत्याही स्वरूपाचे लेखी आदेश अथवा नियुक्तीपत्र देण्यात आले नाही. हे कर्मचारी शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे काम करत आहेत. आरोग्य सेवा ही अत्यावश्यक सेवा आहे हे कर्मचाऱ्यांना मान्य असून जर या कर्मचाऱ्यांना मोबदला मिळणार नसेल तर ती पिळवणूकच आहे. या सर्व कर्मचाऱ्यांवर होणारा अन्याय आहे.

बरेचसे कर्मचारी आर्थिक अडचणीमध्ये आहेत. थकीत वेतन देण्याची लेखी हमीपत्र व चालू करार मंजूर होण्यापूर्वी ग्रामीण रुग्णालयामार्फत नियुक्ती मंजूर करून घ्यावी. पुढील आदेश कर्मचाऱ्यांना प्राप्त झाले तर कर्मचारी कामावर हजर होतील. यासाठी उपजिल्हा रुग्णालयाने पुढाकार घ्यावा, अशी विनंती सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे.

# खारघरमध्ये अमली पदार्थ विक्रीसाठी आलेला रिक्षाचालक जेरबंद

**पनवेल :** नवी मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने अंमली पदार्थ मुक्त नवी मुंबई अभियान अंतर्गत खारघरमध्ये कारवायी करून अंमली पदार्थाची विक्री करण्यासाठी आलेल्या एका रिक्षाचालकाला अटक केली आहे.

अंमली पदार्थ विरोधी पथकाने खारघर, सेक्टर- ३४ मध्ये छापा टाकून निशार मोहम्मद शेख (वय २३) या रिक्षाचालकाला ताब्यात घेतले. या वेळी पोलिसांनी त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडे ५ लाख ३५ हजार ६०० रुपये किंमतीचे ५३.५६ ग्रॅम मेथ्यॅक्युलोन सापडले. निशार शेख याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

# नवघरच्या चेतन भोईर यांचे सुयश

**उरण : वार्ताहर, बातमीदार**



उरणमधील नवघर गावाचे सुपुत्र चेतन मनोहर भोईर यांनी एलएलबीची परीक्षा चांगल्या गुणांनी पास करून नवघर गावामधून वकील होण्याचा पहिला मान मिळविला असल्याने चेतन भोईर यांच्यावर नवघर ग्रामस्थांसह त्यांचे नातेबाईक हितचिंतक आणि मित्र परिवाराकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

चेतन हे चांगले कवी व गीतकार व नृत्यविशारद आहेत. त्यांनी लिहिलेल्या गीतांवर आधारित त्यांचे अनेक अलबंब प्रसिद्ध झाले आहेत. रयत शिक्षण संस्थेत शिक्षण घेत असतना कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्वावलंबी शिक्षण ही संकल्पनेचा आदर्श मी डोळ्यापुढे ठेवला आणि पार्टटाइम नोकरी करून मी माझे महाविद्यालयीन व वकिली पर्यंतचे सर्वशिक्षण पूर्ण केले असल्याचे चेतन भोईर यांनी सांगितले.

# तळोजात पदपथावरच डेब्रिज; गटार परिसरात पाणी साचून दुर्गंधी

**पनवेल : वार्ताहर**

पावसाळ्यात शहरातील नाले तुंबू नये, यासाठी पालिकेकडून नालेसफाई केली जात आहे, मात्र पालिकेच्या ठेकेदारांकडून गटारातून बाहेर काढलेली माती तशीच पदपथांवर ठेवण्यात आली असल्यामुळे तळोजामधील नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे.

तळोजा वसाहत सिडकोकडे असताना सेक्टरनिहाय ठेकेदारांची नेमणूक करून नाले, गटारे साफसफाईची कामे दिली जात होती. अशातच आता सिडको वसाहत पनवेल पालिकेकडे हस्तांतर झाल्यावर पावसाळ्यापूर्वीची कामे योग्य प्रकारे होतील, अशी अपेक्षा रहिवाशांना होती, मात्र परिस्थिती अजूनही तशीच असल्याचा अनुभव तळोजावासीयांना येत आहे. कारण पावसाळा सुरू झाल्यानंतरही तळोजा फेज एक वसाहतीत गटारांची साफसफाई केली जात असून काढलेली माती, कचरा पदपथांवरच ठेवला असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

पावसाळी कामासाठी प्रकल्पग्रस्त ठेकेदाराच्या चढाओढीमुळे काम मिळावे, म्हणून कमी दरात निविदा भरली जात असे. त्यामुळे अनेकदा नाले, गटारांची साफसफाई होत नसल्याचे निदर्शनास येत होते. आता तळोजा वसाहत पालिकेकडे हस्तांतरित झाली असून ज्या प्रभागात पाणी तुंबण्याची शक्यता आहे.

> **तळोजा परिसरात पनवेल पालिकेने नेमलेल्या कॉन्ट्रक्टरने कोणत्याही गटारांची सफाई पूर्ण केली नाही. जी गटारे साफ केली आहेत ती फक्त चेंबर साफ करून अर्धवट ठेवली आहे. त्यामुळे सर्व घाण तशीच पडून आहे. या घाणीमुळे दुर्गंधीसह रोगराईला आमंत्रण मिळत आहे. पालिकेने या समस्येची गांभीर्याने दखल घ्यावी.**
>
> **-प्रल्हाद केणी,**
> **जिल्हा उपाध्यक्ष, भाजप**

# मांसाहारी खवय्यांना लागले गटारींचे वेध

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सध्या आषाढ (आखाड) महिन्याचा शेवटचा आठवडा शिल्लक राहिला असून येत्या मंगळवारी ११ जुलै रोजी व १६ जुलै रोजी गटारी अमावस्या साजरी करण्यासाठी अनेक मासांहारी खवय्ये सज्ज झाले असताना बाजारात गावरान कोंबड्यां सोबतच मटण, मच्छीचा भाव देखील प्रचंड वधारला असल्याचे पहावयास मिळत आहे. यंदा अधिक आषाढ महिना असल्याने खवय्यांना तब्बल दोन महिने मांसाहार वर्ज करावा लागणार असल्याने त्यामुळे सोमवारी (दि.१७) आषाढ अमावस्या आल्याने आतापासूनच गटारी साजरी करण्याचे गटारी मनसुबे गल्लोगल्ली आणि नाक्यानाक्यावर रचले जात आहेत.

हल्ली गटारी साजरी करण्याच्या ट्रेंड काही औरच बदलत चालला आहे. घरी कुटुंब आणि बाहेर दिल दोस्ती दुनियादारी अशा दोन प्रकारे गटारी साजरी केली जाते. 'बाहेर' दिल दोस्ती दुनियादारी च्या गटारीसाठी स्वाभाविकच फार्महाउस, डोंगर कपाऱ्यातील फेसाळते धबधबे, नदी, नाले, झरे अशा निर्सगसन्निध जागांना पसंती दिली जाते.

गटारीबाजानी आता पासूनच गटारी सेलिब्रेशनचे प्लानिंग करून ठेवले आहेत. अनेकांनी तर रिसोर्ट, फार्म हाऊसची बुकिंग केली आहे. प्रत्येकजण आपल्या ग्रुपशी सोशल मिडीयाच्या माध्यमातून एकत्र आल्याने एका सेकंदात वन डे गटारी स्पेशल चे बेत आखले जात आहेत. आता पासूनच फेसबुक, व्हॉटसअॅपवर गटारी स्पेशल चे झनझनीत मेसेज आणि इमेज फिरू लागले आहेत. गटारी म्हणजे राष्ट्रीय सणच झाला आहे. तरुणाईला जितके गटारीचे आकर्षण आहे तितकेच बच्चे कंपनी पासून जेष्ठांना आहे. प्रत्येकाचा एकच विषय गटारी स्पेशल काय...कुठे जायचे अशा चर्चा सध्या ऑफिस, ट्रेन, कट्टा, नाक्यावर रंगू लागल्या आहेत.



रात्रीचे नऊ वाजले की, प्रत्येकाच्या व्हाटसप ग्रुपवर चर्चा रंगली जाते ती गटारीला कोण कोण येणार... मग प्रत्येकजण आपली मते आणि सूचना मांडतो. त्यात कधीही ग्रुपवर अक्टीव नसणारेदेखील आपल्या पोस्ट टाकण्यास सहभागी होतो. त्यात प्रत्येकजण हा नवनवीन स्पॉट च्या शोधून काढतात, मग कुणी म्हणतो आपल्या जवळच्या रबाले रेल्वे स्थानकापासून तीन किलोमीटरवर असलेला गवळीदेव धबधबा, तर कुणी पांडवकडा तर अनेकजण पूर्वेकडील डोंगरमाथ्यावरून धो धो वाहणाऱ्या धबधब्याच्या सानिध्यात गटारी साजरी करण्याचे प्लनिंग करत आहेत.

अनेक जण तर पनवेलजवळील गाढेश्वर धरण, उरणमधील रानसई धरण, झेनिथ धबधबा अशा जवळपास प्रवासाच्या दृष्टीने जवळ असणाऱ्या या पर्यटन स्थळाचे पावसाळ्यातील सौंदर्य अधिक खुलून जाते. काहींच्या तर आतापासूनच गटारीच्या पार्ट्यांचा झिंगाट सुरु झाला आहे . काहींची तर मंगळवार (दि. ११) पासूनच गटारी स्पेशल पार्ट्या सुरू झाल्या आहेत. मांसाहारा सोबत मद्याच्यादेखील पार्ट्या जोरात साजऱ्या केल्या जातात.

### आतापासूनच भाकरी व मटणाच्या ऑर्डर

सध्या गावरान कोंबड्याला ४०० ते ६०० रुपये तर गावरान कोंबडीला ४०० ते ५०० रुपयांना विकले जात आहे.पापलेट, रावस, कोलंबी ५०० ते १५०० पर्यंत भाव वाढ झाली आहे. गटारी जवळ आली की घरगुती आगरी जेवणाला मागणी हि वाढली जाते. घरगुती तांदळाची भाकरी व मटणाच्या ऑर्डर आतापासूनच दिल्या जात आहेत.

# चिरनेर आदिवासी वाडीवर वॉटर प्युरिफाय कॅनचे वाटप

**उरण : वार्ताहर**

सारडे विकास मंचचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे याच्या वाढदिवसाच औचीत्य साधत साई कृपा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी कोप्रोली आयोजित फोर लाईफ कंपनीतर्फे चिरनेर आदिवासी वाडी वर सावा वॉटर प्युरिफायर कॅनची वाटप करण्यात आले.

पाण्यापासुन होणारे आजार आदिवासी बाधवांना होऊ नये आणि त्यांना शुद्ध पाणी मिळावे यासाठी प्रत्येक घरात म्हणजे ६० कुटुंबातील महिलांना हे कॅन वाटप करण्यात आले. जार कसे वापरावे त्याचे फायदे काय आहेत हे संतोष खंडागळे तसेच जयश्री खंडागळे यांनी आदिवासी महिलांना समजाऊन सांगितले कार्यक्रमासाठी राकेश पाटील, रुपाली म्हात्रे, त्रिजन पाटील, सिद्धार्थ ठाकूर, जयेश म्हात्रे, सचिन पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुरेखा अंकुश कातकरी आदित्य ठाकूर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजना भोईर यांनी केले, तर आभार सन्नी बोरसे यांनी मानले. भविष्यात सारडे विकास मंच अनेक सामाजिक शैक्षणिक कार्ये त्याच्या हातून घडो, अशा शुभेच्छा शेवटी सर्वांनी नागेंद्र म्हात्रे यांना दीर्घायुष्य लाभो, अशी प्रार्थना करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



# म्हसळा महावितरणकडे पावणेतीन कोटींची थकबाकी

## विजबिल न भरल्यास कनेक्शन तोडणार; महावितरणचा इशारा

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा विभागातील वीज ग्राहकांनी वेळेत बिल न भरल्याने महावितरणकडे एकूण दोन कोटी ७४ लाखांची थकबाकी झाली आहे. त्यामुळे थकीत वीज बिलाच्या वसुलीसाठी महावितरणकडून केल्या जाणाऱ्या कारवाईला थकबाकीदार ग्राहकांना कडक कारवाईला सामोरे जावे लागेल, असे म्हसळा महावितरणचे उपकार्यकारी अभियंता प्रदीप पटवारी यांनी सांगितले.

तालुक्यातील आंबेत, खामगाव, मेंदडी, म्हसळा शहरआणि म्हसळा या विभागातील चार हजार १९४ ग्राहकांनी रुपये दोन कोटी ७४ लक्ष रुपये थकविले आहेत. यामध्ये घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक, सरकारी कार्यालये, शेती, पथदिवे, नळ पाणीपुरवठा आणि इतर ग्राहकांचा समावेश आहे.

उपविभागाची थकबाकी घरगुती ३५२१ ग्राहकांची ३३.७१ लक्ष थकबाकी, वाणिज्य २२४ ग्राहकांची ५.३४ लक्ष थकबाकी, औद्योगिक ३० ग्राहकांची ९६ हजार थकबाकी, शेती ११३ ग्राहकांची ९४ हजार थकीत, पथदिवे १२१ ग्राहकांची २१७.०६ लक्ष थकबाकी, पाणीपुरवठा ३९ ग्राहकांची ११.१० लक्ष थकबाकी, सार्वजनिक सेवा १२७ ग्राहकांची ३.३३ लक्ष थकबाकी, इतर १६ ग्राहकांची १.५३ लक्ष थकबाकी आहे.

### कर्मचाऱ्यांकडून घरोघरी आवाहन

ग्राहकाभिमुख सुविधांसाठी वीजग्राहकांनी तत्काळ थकबाकी भरून वीज वितरण कंपनीला सहकार्य करावे, असे आवाहन उपकार्यकारी अभियंता प्रदीप पटवारी यांनी केले आहे. कनिष्ठ अभियंतासह स्थानिक वीज कर्मचारी घरोघरी जाऊन करीत आहेत. ग्राहकांनी लवकरात लवकर आपली थकबाकी भरावी अन्यथा वीज कनेक्शन तोडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# मुरुड शहराला सतावतेय विजेची समस्या

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहरात पावसाच्या आगमनानंतर वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार वाढले आहेत. यामुळे नागरिक हैराण झाले असून नागरिकांना आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे.



नुकताच पावसाची सुरुवात आहे. अजून पावसाचे बहुतांशी दिवस बाकी असल्याने वीज गायब होतच राहणार का? असा संतप्त सवाल येथील नागरिक विचारत आहेत. दर मंगळवारी कामानिमित्त दिवसभर वीजपुरवठा खंडित करीत असताना त्या वेळी कोणती कामे केली जात आहेत? असाही सवाल उपस्थित होत आहे.

वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांच्या घरातील, दुकानातील वीजेवर चालणारी उपकरणे नादुरूस्त होण्याचे प्रकार वाढत असल्याने याबाबत ठोस उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

# एम. बी. मोरे महाविद्यालयाचा मुंबई विद्यापीठाच्या कार्यशाळेत सहभाग

**रोहे : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवाबाबत एमजीएम महाविद्यालय, कामोठे येथे आयोजित केलेल्या युवा एकदिवसीय कार्यशाळेत मोरे महिला महाविद्यालयाने सहभाग घेतला.

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. सुरभी ठाकूर, त्यांच्या सहकारी प्रा. मयुरी लहाने व विद्यार्थिनी प्रतिनिधी प्रिया नरेश भोईर यांनी कार्यशाळेत सहभाग घेतला. मुंबई विद्यापीठाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. निलेश सावे यांनी स्पर्धकांना मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेतून मिळालेल्या मार्गदर्शनानुसार मोरे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रसन्न म्हसळकर यांनी प्राध्यापकांच्या सहाय्याने सहभागाचे नियोजन केले आहे.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ४०/२०२३-२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांची देखभाल व दुरूस्ती.. पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांची दोन वर्षे कालावधीकरीता वार्षिक तत्वावर देखभाल व दुरुस्ती करणे. | ₹ ३९,१९,४३०.०० |
| २. | नागोठाणे आयपीसीएल (आरआयएल) औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती.. नागोठणे जलशुद्धीकरण केंद्रातील फिल्टर बेडसाठी ड्रेनिंग सिस्टीमचे आयसोलेशन उपकरण बदलणे. | ₹ ३९,८८,४९६.०० |

उपरोक्त कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक १३/०७/२०२३ ते दिनांक २७/०७/२०२३ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामाबाबत दिनांक १७/०७/२०२३ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १९/०७/२०२३ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

मे.पवार सो. अर्जदारातर्फे वकील ॲड. साजिद शेख ॲड.अनिकेत चौधरी

## जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर)यांचे कोर्टात**

दिवाणी चौकशी अर्ज क्र.८८०/२०२३ नि.नं.८ /ड ने.ता.११/०९/२०२३

रहिमा मोहीउद्दीन बडे वगैरे — **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही — **सामनेवाला**

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडील **पै. मोहीद्दीन हसन बडे हे दिनांक ०४/०२/२०२३** रोजी निकम परमार हॉस्पीटल पनवेल ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार क्र.१ यांची सासू व अर्जदार क्र.२ ते ५ यांची आजी. पै.ऐशा हसन बडे ही दिनांक ०३/१०/२००५ रोजी मौजे जसवली ता. श्रीवर्धन जि. रायगड येथे मयत झालेली आहे.

पै. मोहीद्दीन हसन बडे व इतर यांचे सामाईक मालकीच्या मौजे- पनवेल, ता. पनवेल जि. रायगड व मौजे जसवली, भोस्ते, गुळघे, भट्टीचामाळ,बापवली,भरडोली, मामवली, ता. श्रीवर्धन जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या शेतजमिनीच्या मिळकती आहेत. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे :

१) मौजे पनवेल ता. पनवेल, जि. रायगड येथील पनवेल इंडस्ट्रियल इस्टेट येथील प्लॉट नं ७३ ही मिळकत क्षेत्र ८४५० चौ.फूट ,

२) मौजे पनवेल ता. पनवेल, जि. रायगड येथील पायोनियर सोसायटी या इमारतीमधील जुनी सदनिका क्र.बी-११ नविन सदनिका क्र. बी-८०३ क्षेत्रफळ ४४० चौ.फूट

| गावाचे नाव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|---|
| मौजे जसवली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड | १/१६६ | | |
| | १/१५५ | 0.0१.00 | 0.00 |
| | ३३ | 0.0२.८0 | 0.00 |
| | ५३ | 0.0१.00 | 0.0२ |
| | ५७ | 0.७८.९0 | १.0९ |
| | ९४ | 0.३६.८0 | २.३७ |
| | २३९ | 0.२६.00 | 0.२0 |
| | २५३ | 0.१५.00 | 0.0६ |
| | २५७ | 0.४५.00 | 0.१७ |
| | | 0.५२.00 | 0.२३ |
| मौजे भोस्ते, ता. श्रीवर्धन, जि. रायगड | २२ | 0.५४.0 | 0.४४ |
| | ६९ | 0.२१.३0 | 0.१७ |
| | ७0 | 0.२१.00 | 0.१९ |
| | ७१ | 0.९४.८0 | 0.७६ |
| | १३४ | 0.२३.९0 | 0.१४ |
| | १४६ | २.६४.00 | 0.२४ |
| | २२५ | 0.६२.00 | 0.२३ |
| | २३६ | 0.४३.00 | 0.१९ |
| | २८२ | 0.१९.0 | 0.१२ |
| | ३१९ | 0.११.0 | 0.0६ |
| मौजे भट्टीचामाळ, ता. श्रीवर्धन, जि. रायगड | १६ | १.0२.१0 | २.६८ |
| मौजे बापवली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड | २१४ | 0.२४.0 | 0.१६ |
| | २७0 | 0.३३.0 | 0.४५ |
| मौजे भरडोली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड | ५३ | ३.0७.00 | १.0६ |
| | १२३ | १.८२.00 | 0.८६ |
| मौजे मामवली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड | ३ | 0.१२.४0 | 0.२७ |
| | ३६ | 0.0५.00 | 0.0२ |
| | ३९ | 0.0३.00 | 0.0९ |
| | ५३ | 0.0३.00 | 0.0२ |
| | ७९ | 0.१७.00 | 0.0६ |
| | ९७ | 0.३४.00 | 0.१२ |
| | १0९ | 0.३३.00 | 0.१२ |
| | १५७ | 0.२१.६0 | १.४४ |
| | १८९ | 0.५२.00 | 0.२२ |
| | १८६ | 0.४८.00 | 0.१७ |
| | १८0 | 0.९३.00 | 0.३३ |
| | १६७ | 0.३७.00 | 0.१२ |
| | १७३ | 0.११.00 | 0.0२ |
| | १९६/२ | 0.२१.00 | 0.0९ |
| | १९६/१ | 0.३४.00 | 0.१४ |
| | १९२ | 0.५२.00 | 0.२२ |
| | ३0३ | १.३६.00 | 0.५५ |
| | ३१५ | १.७८.00 | 0.६९ |
| | ३७३ | 0.0६.00 | 0.0५ |
| | ३७८ | 0.१0.00 | 0.0६ |
| | ३९५ | 0.१२.९0 | 0.६६ |
| | ३९६ | 0.0८.३0 | 0.३७ |
| | ३९७ | 0.२३.५0 | 0.७८ |
| | २0५ | 0.८४.00 | 0.२८ |
| | २0७/१ | 0.२४.00 | 0.0८ |
| | २0७/२ | 0.६८.00 | 0.२२ |
| | २१२ | 0.६७.00 | 0.२८ |
| | २१४/१ | 0.0५.00 | 0.0३ |
| | २१४/२ | 0.४0.00 | 0.१९ |
| | २१४/३ | 0.७६.00 | 0.३३ |
| | २१४/४ | 0.५८.00 | 0.२५ |
| | २१४/५ | 0.७६.00 | 0.३३ |
| | २२४/१ | 0.४८.00 | 0.२0 |
| | २२४/२ | 0.0६.00 | 0.0३ |
| | २२४/३ | 0.५८.00 | 0.२२ |
| | २२४/४ | 0.२३.00 | 0.0९ |
| | २२४/५ | 0.५७.00 | 0.२0 |
| | २२४/६ | 0.२२.00 | 0.0९ |
| | २२४/७ | 0.११.00 | 0.0५ |
| | २३0 | 0.१८.00 | 0.0८ |
| | २३२/१ | 0.0९.00 | 0.0३ |
| | २३२/२ | 0.0१.00 | 0.0२ |
| | २८४/१ | 0.0८.00 | 0.0३ |
| | २८४/२ | 0.0२.00 | 0.0२ |
| | २९0/१ | 0.३२.00 | 0.१२ |
| | २९0/२ | 0.४२.00 | 0.१६ |
| | २४६ | 0.0१.00 | 0.0२ |
| | २५0/१ | 0.0४.00 | 0.0२ |
| | २५0/२ | 0.0९.00 | 0.0२ |
| | २५१/१ | 0.४३.00 | 0.१0 |
| | २५१/२ | 0.४१.00 | 0.0९ |
| | २५१/३ | १.७0.00 | 0.४१ |
| | २५६ | 0.१८.00 | 0.0५ |
| | ३६१ | 0.१९.00 | 0.0९ |
| | २६५ | 0.0३.00 | 0.0२ |
| | २६६ | 0.0१.00 | 0.0२ |
| | २७0 | 0.0१.00 | 0.0२ |
| | २७५/१ | 0.0२.00 | 0.0२ |
| | २७५/२ | 0.0१.00 | 0.0२ |
| | २७५/३ | 0.३४.00 | 0.0८ |
| | २९८ | 0.0१.00 | 0.0२ |
| मौजे गुळधे, ता. श्रीवर्धन, जि. रायगड | २४७ | 0.२७.८0 | 0.२३ |

तरी वरील मिळकतींबाबत पै. मोहीद्दीन हसन बडे यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केला आहे. तरी सदर वारस दाखल्याच्याकामी कोणाच्याही कोणत्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याचे आत मेहरबान कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख ११/०७/२०२३ रोजी माझ्या सहीने व कोर्टाचे शिक्क्याने नोटीस दिली.

**कनिष्ठ लिपिक**
**दि.न्या.(व.स्तर) पनवेल-रायगड**

(कोर्टाचा शिक्का)

**सहा.अधीक्षक**
**दि.न्या.(व.स्तर) पनवेल-रायगड**

पान ५ वरुन...



**अनुसूची - एक**

**(जमिनीचे वर्णन)**

गाव - मौजे माणघर, ता.पनवेल, जि.रायगड

नवी मुंबई प्रकल्प तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व तदानुषंगिक कामाकरिता भूसंपादन

| अ. क्र. (१) | भूमापन किंवा गट क्रमांक (२) | अंदाजित क्षेत्र (हेक्टर. आर मध्ये) (३) |
|---|---|---|
| १ | ८२/१ | ०-१८-५० |
| २ | ८३ | ०-२६-०० |
| ३ | ८४/१ | ०-२३-३० |
| ४ | ८४/२ | ०-३९-४० |
| ५ | ८५ | ०-१२-९० |
| | **एकूण** | **१-२०-१०** |

**अनुसूची - दोन**

**(सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण)**

**प्रकल्पाचे नाव :-** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व तदानुषंगिक कामाकरिता.

**प्रकल्प कार्याचे वर्णन :-** मौजे माणघर, ता.पनवेल येथील नवी मुंबई प्रकल्पांतर्गत विकास कार्यासाठी आवश्यक आहे.

**समाजाला मिळणारे लाभ :-** नवी मुंबई शहराचे औद्योगिक महत्त्व, वाढते नागरीकरण व पर्यटन, वाढते महत्त्व लक्षात घेता येत्या दशकात नवी मुंबई शहराचा विकास आणि विस्तार वेगाने होईल.

**अनुसूची - तीन**

**(पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन)**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :-** प्रस्तावित जमिनीच्या भूसंपादनामुळे किती खातेदार विस्थापित होतील हे माहितीअभावी सांगता येणार नाही.

**अनुसूची - चार**

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

मौजे माणघर, ता. पनवेल येथील सर्व्हे नं./हिस्सा नं. ८२/१, ८३, ८४/१, ८४/२, ८५, एकूण क्षेत्र १.२०.१० हे.आर. ही जमीन नवी मुंबई प्रकल्पासाठी आवश्यक असून सदर जमिनीचे भूसंपादन प्रस्तावित आहे. सदर भूसंपादन शहर व औद्योगिक विकास महामंडळ, अर्थात सिडकोकरिता नवीन भूसंपादन कायद्यांतर्गत शहरीकरण व संदर्भिय विकास या सामाजिक प्रयोजनासाठी करण्यात येत आहे.

नवी मुंबई हे शहर मुंबईची गर्दी कमी करण्याचे साधन राहिले नसून एक आकर्षण केंद्र बनले आहे. नवी मुंबईचा अंतर्भाव आता स्मार्ट सिटीच्या यादीमध्ये झाला आहे. यामुळे नवी मुंबई प्रकल्पाचा विस्तार नवीन टप्प्यावर पोचला आहे.

तंत्रज्ञानावर आधारित स्मार्ट सिटीच्या निर्माणाकरिता अनेक नवीन सोयीसुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे. स्मार्ट सिटी योजनेत पनवेलच्या आसपासच्या गावांचा विकास करण्याची योजना आहे. यामध्ये कोपर, ओवळे, पारगावडुंगी, वहाळ इत्यादी गावांचा समावेश होतो. नवी मुंबई प्रकल्पाचा विस्तार व समग्र विकासाकरिता प्रस्तावित जमिनीची आवश्यकता आहे. सिडको मार्फत या जमिनीचा वापर विकासकामांकरिता व नागरी सुविधांसाठी होणार असून त्याचा लाभ सामान्य नागरिकांना होणार आहे.

माणघर गाव हे पनवेल पासून केवळ ६ कि. मी. अंतरावर आहे. या गावाची बरीच जमीन नवी मुंबई प्रकल्पाकरिता १९७२ सालापासून संपादीत करण्यात आली आहे. गावठाण व लोकवस्ती पूर्वीप्रमाणेच असून सध्या ९३ च्या वर घरे आहेत. आजूबाजूला वेगाने नागरीकरण झाल्यामुळे शेती व्यवसाय पूर्वीच बंद पडला आहे. नागरिक विविध व्यवसाय व नोकरी धंद्यामध्ये गुंतलेले दिसतात.

अलिबाग,
दिनांक २६ जून २०२३.

**डॉ. योगेश म्हसे,**
जिल्हाधिकारी, रायगड.

RNI No. MAHBIL 2009/36619

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ९, अंक ४७(२)] बुधवार, जुलै ५, २०२३/आषाढ १४, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ७०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**जिल्हाधिकारी, रायगड यांजकडून**

**अधिसूचना**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक भूसं/टे-८/एस.आर. २०/२०१८/वहाळ/२०२३.—ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना, दिनांक १४ जुलै २०२१ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १, पनवेल यास पदनिर्देशित करीत आहे.



**अनुसूची - एक**

**जमिनीचे वर्णन**

**गाव - वहाळ, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| १ | २९४/१ | ०.१३.०० |
| | **एकूण** | **०.१३.००** |

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**अधिसूचना प्रकल्पाचे नाव** : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व तदानुषंगिक कामासाठीचा प्रकल्प.

**निर्गमित प्रकल्पकार्याचे वर्णन** : मौजे वहाळ, ता. पनवेल येथील नवी मुंबई प्रकल्पा अंतर्गत विकास कार्यासाठी आवश्यक आहे.

**समाजाला मिळणारे लाभ** : नवी मुंबई शहराचे औद्योगिक महत्त्व वाढते नागरीकरण व पर्यटन वाढते महत्त्व लक्षात घेता येत्या दशकात नवी मुंबई शहराचा विकास आणि विस्तार वेगाने होईल.

**अनुसूची - तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :—** पुरेशा माहिती अभावी सांगता येणार नाही.

**अनुसूची - चार**

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :—**

मौजे वहाळ, ता.पनवेल येथील सर्व्हे नं./हिस्सा नं. २९४/१, एकूण क्षेत्र ०.१३.०० हे.आर ही जमीन नवी मुंबई प्रकल्पासाठी आवश्यक असून सदर जमिनीचे भूसंपादन प्रस्तावित आहे. सदर भूसंपादन शहर व औद्योगिक विकास महामंडळ, अर्थात सिडकोकरिता नवीन भूसंपादन कायद्यांतर्गत शहरीकरण व संदर्भिय विकास या सामाजिक प्रयोजनासाठी करण्यात येत आहे.

नवी मुंबई हे शहर मुंबईची गर्दी कमी करण्याचे साधन राहिले नसून एक आकर्षण केंद्र बनले आहे. नवी मुंबईचा अंतर्भाव आता स्मार्ट सिटीच्या यादीमध्ये झाला आहे. यामुळे नवी मुंबई प्रकल्पाचा विस्तार नवीन **टप्प्यावर** पोचला आहे.

तंत्रज्ञानावर आधारित स्मार्ट सिटीच्या निर्माणाकरिता अनेक नवीन सोयीसुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे. स्मार्ट सिटी योजनेत पनवेलच्या आसपासच्या गावांचा विकास करण्याची योजना आहे. यामध्ये कोपर, ओवळे, पारगावडुंगी, वहाळ इत्यादी गावांचा समावेश होतो. नवी मुंबई प्रकल्पाचा विस्तार व समग्र विकासाकरिता प्रस्तावित जमिनीची आवश्यकता आहे. सिडको मार्फत या जमिनीचा वापर विकासकामांकरिता व नागरी सुविधांसाठी होणार असून त्याचा लाभ सामान्य नागरिकांना होणार आहे.

वहाळ गाव हे पनवेल पासून केवळ १२ कि.मी. अंतरावर आहे. या गावाची बरीच जमीन नवी मुंबई प्रकल्पाकरिता १९७२ सालापासून संपादीत करण्यात आली आहे. गावठाण व लोकवस्ती पूर्वीप्रमाणेच असून सध्या १२०० च्या वर घरे आहेत. आजूबाजूला वेगाने नागरीकरण झाल्यामुळे शेती व्यवसाय पूर्वीच बंद पडला आहे. नागरिक विविध व्यवसाय व नोकरीधंद्यामध्ये गुंतलेले दिसतात. सन २००३ पासून नवी मुंबई महानगरपालीकेत समाविष्ट करण्यात आले आहे.

अलिबाग,
दिनांक २६ जून २०२३. क्र. जिमाका/राअ/जाही/६५/२०२३-२४

**डॉ. योगेश म्हसे,**
जिल्हाधिकारी, रायगड.

# भारत-पाक सामना श्रीलंकेतच होणार!

## आशिया चषक स्पर्धेबाबत बीसीसीआयची माहिती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशिया चषक स्पर्धेसंदर्भात एक मोठी अपडेट समोर आली आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील बहुचर्चित आशिया चषक सामना श्रीलंकेत होणार आहे. आयपीएलचे अध्यक्ष अरुण धुमाळ यांनी बुधवारी (दि. १२) याला दुजोरा दिला. धुमाळ सध्या आयसीसीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या बैठकीसाठी डर्बनमध्ये आहेत. बीसीसीआयचे सचिव जय शाह आणि पीसीबीचे प्रमुख झका अश्रफ यांची गुरुवारच्या आयसीसी बोर्डाच्या बैठकीपूर्वी आशिया चषकाचे वेळापत्रक निश्चित करण्यासाठी बैठक झाल्याची पुष्टी त्यांनी केली.

धुमाळ यांनी सांगितले की, जय शाह यांनी पीसीबी प्रमुख झका अश्रफ यांची भेट घेतली आणि आशिया कपचे वेळापत्रक निश्चित झाले आहे. आधी जे बोलले जात होते त्याच्याशी हे




सुसंगत आहे. पाकिस्तानमध्ये साखळी टप्प्यातील चार सामने आणि त्यानंतर श्रीलंकेत नऊ सामने होतील. त्यात भारत आणि पाकिस्तानच्या सामन्याचा समावेश आहे. दोन्ही संघ अंतिम सामना खेळले तर तोही श्रीलंकेतच होईल. भारतीय संघ पाकिस्तानला जाणार असल्याच्या पाकिस्तानी मीडियामध्ये बातम्या येत होत्या, पण या अफवा फेटाळून लावण्यात आले.

आशिया चषक ३१ ऑगस्ट ते १७ सप्टेंबरदरम्यान खेळवला जाणार असून सहा संघांमध्ये एकूण १३ सामने खेळवले जाणार आहेत. त्यात फायनलचाही समावेश आहे. हा सामनादेखील कदाचित श्रीलंकेत खेळवला जाईल. या स्पर्धेत पाकिस्तानात फक्त चार सामने खेळण्यात येणार आहेत, तर उर्वरित नऊ सामने श्रीलंकेत होतील. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना श्रीलंकेतील डांबुला येथे होणार आहे. त्याचवेळी पाकिस्तान आपला एकमेव सामना घरच्या मैदानावर नेपाळविरुद्ध खेळणार आहे. याशिवाय अफगाणिस्तान विरुद्ध बांगलादेश, बांगलादेश विरुद्ध श्रीलंका आणि श्रीलंका विरुद्ध अफगाणिस्तान हे सामने पाकिस्तानमध्ये होतील.

### अशा होतील लढती

यंदा आशिया चषक ५० षटकांच्या फॉरमॅटमध्ये खेळवला जाईल. स्पर्धेत भारत, पाकिस्तान, श्रीलंका, अफगाणिस्तान, बांगलादेश आणि नेपाळ संघ सहभागी होणार आहेत. एका गटात भारत, नेपाळ आणि पाकिस्तानचा समावेश आहे, तर श्रीलंका, बांगलादेश आणि अफगाणिस्तान दुसऱ्या गटात राहतील. दोन्ही गटांतील प्रत्येकी दोन संघ सुपर ४मध्ये पोहचतील. तिथे राऊंड रॉबिन पद्धतीने एकूण सहा सामने खेळवले जातील. यानंतर दोन संघ अंतिम फेरीत पोहचतील आणि त्यांच्यात विजेतेपदाचा सामना रंगेल.

# किक बॉक्सिंग स्पर्धेत उरणच्या शुभम म्हात्रेला दोन सुवर्णपदके



**उरण : बातमीदार**


वाको इंडिया नॅशनल किकबॉक्सिंग सिनियर अ‍ॅण्ड मास्टर चॅम्पियनशिप २०२३ स्पर्धा नुकतीच पंजाबमधील जालिंदर येथील लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी येथे झाली. या स्पर्धेत रायगड जिल्ह्याच्या उरण तालुक्यातील जासई गावचा सुपुत्र शुभम परशुराम म्हात्रे याने महाराष्ट्राकडून प्रतिनिधित्व करताना किकबॉक्सिंग स्पर्धेत दोन सुवर्णपदके जिंकली. याबद्दल त्याचे कौतुक होत आहे.

शुभम म्हात्रेने किक लाईट या इव्हेंटमध्ये ६९ वजनी गटात तसेच टीम पॉईंट फाईट या प्रकारात सुवर्णपदक पटकाविले. महात्मा फुले सामाजिक मंडळाचे अध्यक्ष व लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील यांनी व अविनाश पाटील यांनी शुभमला स्पर्धेसाठी आर्थिक मदत केली होती, तर कोच म्हणून महाराष्ट्र वाको किकबॉक्सिंगचे अध्यक्ष निलेश शेलार, युथ अकॅडमी अध्यक्ष संतोष मोकल, जीवन ढकवाल, नंदकुमार मोकल, मिलन जाधव, महेंद्र कोळी, शैलेश ठाकूर तसेच मार्गदर्शन म्हणून रायगड किकबॉक्सिंगचे अध्यक्ष सुधाकर घारे व सेक्रेटरी दीपेश सोळंकी यांचे सहकार्य लाभले.

या यशाबद्दल शुभमचे सर्वत्र कौतुक होत असून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# देवधर ट्रॉफीसाठी अर्जुन तेंडुलकरची निवड

## दक्षिण विभागीय संघात समावेश



**मुंबई : प्रतिनिधी**

दिग्गज क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकर दीर्घ प्रतीक्षेनंतर यंदाच्या आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सकडून खेळताना दिसला. आता आगामी देवधर ट्रॉफीसाठी अर्जुनचा दक्षिण विभागीय संघात समावेश करण्यात आला आहे.

डावखुरा वेगवान गोलंदाज आणि खालच्या फळीतील फलंदाज असलेल्या अर्जुनने इंडियन प्रीमियर लीगच्या शेवटच्या हंगामात मुंबई इंडियन्सकडून पदार्पण केले. भारतीय क्रिकेट बोर्डाने त्याला ऑगस्टमध्ये उदयोन्मुख अष्टपैलू खेळाडूंच्या शिबिरातही स्थान दिले होते. गोव्याच्या अर्जुनशिवाय कर्नाटकच्या विद्वत कावेरापा आणि विजयकुमार विशाक आणि व्ही कौशिक यांना दक्षिण विभागीय वेगवान आक्रमणात स्थान मिळाले आहे.

पुद्दुचेरी येथे २४ जुलैपासून होणाऱ्या देवधर ट्रॉफी या ५० षटकांच्या स्पर्धेसाठी मयंक अग्रवालच्या नेतृत्वाखालील दक्षिण विभागीय संघात अर्जुन तेंडुलकरची निवड झाली आहे. १३ ते २३ जुलैदरम्यान कोलंबो येथे होणाऱ्या इमर्जिंग आशिया कपमध्ये खेळणाऱ्या बी साई सुदर्शनला स्टँडबाय खेळाडू म्हणून निवडण्यात आले आहे.

# टीम इंडियातील उणिवांवर युवराजने ठेवले बोट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडियाचा माजी अष्टपैलू खेळाडू युवराज सिंग याने भारतीय संघाच्या समस्यांकडे लक्ष वेधले आहे. त्यामुळे २०२३च्या विश्वचषक स्पर्धेत आपला संघ जिंकेल की नाही याची खात्री नाही, असे युवराजने म्हटले आहे.

क्रिकेट बासू या युट्युब चॅनेलवरील फ्रीव्हीलिंग चॅटमध्ये युवराज सिंगने भारतीय क्रिकेटच्या स्थितीबद्दल क्रीडा प्रस्तुतकर्त्यासमोर खुलासा केला. त्याला भारताच्या २०२३च्या विश्वचषकाच्या संभाव्यतेबद्दल विचारण्यात आले तेव्हा तो म्हणाला, जर प्रामाणिकपणे सांगायचे तर, मला खात्री नाही की टीम इंडिया विश्वचषक जिंकू शकेल की नाही. मी देशभक्ताप्रमाणे म्हणतो की भारत जिंकेल, मात्र, सत्य परिस्थिती आणि जर क्रिकेटच्या भाषेत बोलायचे तर भारतीय संघात खूप समस्या आहेत. त्या जर दूर केल्या नाहीत तर मी आशा करू शकतो की भारत जिंकेल, पण खात्री देणार नाही. भारतीय संघाच्या मधल्या फळीतील दुखापतींबाबत बरीच चिंता असल्याचे मला दिसत आहे.

भारतीय क्रिकेट संघाच्या गेल्या १० वर्षांतील चढ-उतार कामगिरीबद्दल विचारले असता यावर युवराज टीम इंडियावर भडकला. त्याने स्पष्टपणे सांगितले की, ते (भारत) विश्वचषक जिंकू शकले नाहीत हे पाहून निराशा होत आहे, पण सत्य परिस्थिती ही आहे की मुख्य प्रश्नांकडे कोणी गांभीर्याने लक्षच दिले नाही. म्हणूनच



२०२३चा वन डे विश्वचषक भारत जिंकणार नाही.

नॉक-आऊट सामन्यांसारखे दबावातील सामने खेळताना भारत प्रयोग मोडमध्ये राहू शकत नाही, असेही त्याने सुचवले. स्वतःच्या क्रमांक चौथ्या स्थानाबद्दल विचारले असता, युवराजने त्या जागेसाठी के.एल.राहुलचे नाव सुचवले. नव्या दमाचा रिंकू सिंगबाबतही त्याने विधान केले. युवराज म्हणाला, रिंकू सिंग खरोखरच चांगली फलंदाजी करीत होता. मला वाटते की त्याच्याकडे भागीदारी करण्याची आणि तो स्ट्राइक कायम ठेवण्याची समज आहे. जर तुम्हाला तो हवा असेल तर तुम्हाला त्याला पुरेसे सामने द्यावे लागतील.

पुढे युवराजला टीम इंडियाचा प्रशिक्षक व्हायला आवडेल का? असे विचारले. यावर त्याने सांगितले की, होय, मला वाटते की, मी एक चांगला प्रशिक्षक होईन, पण त्यासाठी तुम्हाला काळाबरोबर राहावे लागेल. सध्या मात्र मी हा विचार करीत नाही. माजी क्रिकेटपटू अजित आगरकर यांची निवड समितीच्या अध्यक्षपदीही चांगली निवड करण्यात आली आहे. जर त्याच्या मार्गदर्शनाखाली योग्य संघ निवडला तरच भारत विश्वचषक जिंकू शकतो, मात्र त्यासाठी दुखापतग्रस्त खेळाडूंनी लवकर संघात परतणे गरजेचे आहे.

### मधल्या फळीत समस्या

स्टार खेळाडू युवराजच्या म्हणण्यानुसार, टॉप ऑर्डर ठीक आहे, पण मिडल ऑर्डरमध्ये समस्या आहे. त्यात भारताला बरीच मेहनत घेण्याची गरज आहे. स्लॉट चार आणि पाच खूप महत्त्वाचे आहेत. जर ऋषभ पंत आयपीएल फ्रँचायझीसाठी चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करीत असेल तर त्याने राष्ट्रीय संघासाठीही चौथ्या क्रमांकावर यायला हवे. चौथ्या क्रमांकाचा फलंदाज हा आक्रमक धावा करणारा असू शकत नाही. तो दबाव हाताळू शकेल अशी व्यक्ती असावी. २०१९मध्ये टीम इंडिया जिथे उभी होती, ती अजूनही तिथेच आहे. त्याच्याकडे अजूनही चौथ्या आणि पाचव्या क्रमांकावर कायमस्वरूपी फलंदाज नाही.

# विम्बल्डन टेनिस स्पर्धेत श्वीऑनटेकला पराभवाचा धक्का

**विम्बल्डन : वृत्तसंस्था**

अग्रमानांकित पोलंडच्या इगा श्वीऑनटेकचे विम्बल्डन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेतील आव्हान उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आले. श्वीऑनटेकला बिगरमानांकित युक्रेनच्या एलिना स्विटोलिनाने पराभवाचा धक्का दिला. चार ग्रँडस्लॅम विजेत्या श्वीऑनटेकने विम्बल्डनमध्ये प्रथमच उपांत्यपूर्व फेरीचा टप्पा गाठला होता, मात्र या फेरीत तिला स्विटोलिनाने ५-७, ७-६ (७-५), २-६ असे पराभूत केले. त्यामुळे गेल्या चारपैकी तीन वर्षांत फ्रेंच खुल्या स्पर्धेचे जेतेपद मिळवणाऱ्या श्वीऑनटेकचे प्रथमच विम्बल्डन जिंकण्याचे स्वप्न अधुरेच राहिले.



२८ वर्षीय स्विटोलिनाने गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये मुलीला जन्म दिला आणि या वर्षी एप्रिलमध्ये तिने टेनिस कोर्टवर पुनरागमन केले. त्यानंतर फ्रेंच खुल्या स्पर्धेत तिने उपांत्यपूर्व फेरी गाठली होती. विम्बल्डनमध्ये थेट प्रवेश मिळाल्यानंतरही स्विटोलिनाने चमकदार कामगिरी केली आहे. उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात स्विटोलिनाने सुरुवातीपासून अप्रतिम खेळ केला. तिने श्वीऑनटेकची सर्व्हिस एकदा तोडत पहिला सेट आपल्या नावे केला. दुसरा सेट टायब्रेकरमध्ये गेला आणि यात श्वीऑनटेकला विजय मिळवण्यात यश आले. तिसऱ्या सेटमध्ये मात्र स्विटोलिनाच्या आक्रमक आणि अचूक फटक्यांचे श्वीऑनटेककडे उत्तर नव्हते.

दरम्यान, भारताचा रोहन बोपण्णा आणि त्याचा ऑस्ट्रेलियन साथीदार मॅथ्यू एब्डेन यांनी पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. बोपण्णा-एब्डेन जोडीने उपउपांत्यपूर्व फेरीत डेव्हिड पेल आणि रीस स्टाल्डेर जोडीला ७-५, ४-६, ७-६ (१०-५) असे पराभूत केले.

# वर्ल्डकप सामन्यांच्या तिकिटांचे दर जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

यंदा भारतात होणाऱ्या आयसीसी विश्वचषक स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. ५ ऑक्टोबरपासून या विश्वचषकाला सुरुवात होणार आहे. वर्ल्डकपचा पहिला आणि अंतिम सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जाईल. विश्वचषकाच्या काही सामन्यांची तिकिटे जाहीर करण्यात आली आहेत.





या स्पर्धेत १० ठिकाणी ४८ सामने खेळवले जाणार आहेत. भारतीय क्रिकेट चाहत्यांसाठी थेट स्टेडियममध्ये विश्वचषक सामने पाहण्याची ही उत्तम संधी आहे. कोलकात्याच्या इडन गार्डन्सवर होणाऱ्या सामन्यांची तिकिटांच्या दरांची यादीही आली आहे.

बंगाल क्रिकेट असोसिएशनने सांगितले की, इडन गार्डन्सवर होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य सामन्यासाठी प्रेक्षकांना किमान ९०० रुपये खर्च करावे लागतील. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील सामना आणि उपांत्य फेरीच्या तिकिटांची किंमत ९०० रुपये (अपर टायर) ते तीन हजार रुपये (बी, एल ब्लॉक) दरम्यान असेल. या दोन सामन्यांच्या व्यतिरिक्त इतर तिकिटांची किंमत १५०० रुपये (डी, एच ब्लॉक) आणि २५०० रुपये (सी, के ब्लॉक) असेल. इडन गार्डन्सने पाच विश्वचषक सामने आयोजित केले आहेत आणि येथे ६३ हजार ५०० प्रेक्षक बसण्याची क्षमता आहे.

# कसोटी क्रमवारीत ट्रॅव्हिस हेड दुसऱ्या स्थानी

**दुबई : वृत्तसंस्था**



हेडिंग्ले कसोटी सामना संपल्यानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) ताजी कसोटी क्रमवारी जाहीर केली आहे. त्यानुसार टॉप-५ स्थानांमध्ये मोठा बदल झाला आहे. ऑस्ट्रेलियाचा फलंदाज ट्रॅव्हिस हेडने आपल्याच संघातील अनुभवी खेळाडू स्टीव्ह स्मिथ आणि मार्नस लाबुशेन यांना मागे टाकत दुसरे स्थान पटकावले आहे. ही त्याच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम क्रमवारी आहे.

इंग्लंडविरुद्धच्या अ‍ॅशेस मालिकेतील पहिल्या दोन सामन्यात शानदार कामगिरी करत ट्रॅव्हिस हेडने दोन स्थानांनी झेप घेतली आहे. तो आता न्यूझीलंडचा अनुभवी केन विल्यमसननंतर दुसऱ्या स्थानावर आहे. २९ वर्षीय खेळाडूने अ‍ॅशेसमध्ये ४४.३३च्या सरासरीने २६६ धावा केल्या आहेत. या क्रमवारीत पुन्हा एकदा विल्यमसन नंबर वनच्या खुर्चीवर विराजमान झाला आहे. गेल्या सुमारे चार महिन्यांपासून तो कसोटी खेळला नाही, पण त्यानंतरही गेल्या आठवड्यात त्याने पहिल्या क्रमांकाची खुर्ची काबीज केली होती, जी अजूनही अबाधित आहे. त्याचे ८८३ गुण आहेत.

भावपूर्ण श्रध्दांजली



तुझं असणं
सर्व काही होतं
आयुष्यातील
ते सुंदर पर्व होतं..
आज सर्व काही
असल्याची जाणीव
आहे, पण तुझं नसणं,
हिच मोठी
उणीव आहे

कै. सिध्देश दत्तात्रेय घरत

यांचे रविवारी दिनांक ०९.०७.२०२३ रोजी दु:खद निधन झाले आहे.
तरी त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

दशक्रिया विधी — मंगळवार, दि. १८.०७. २०२३ रोजी स. ८.३० वा. श्री क्षेत्र माणकेश्वर उरण येथे होणार आहे.

उत्तरकार्य बारावा — गुरुवार, दि. २०.०७.२०२३ रोजी राहत्या घरी जासई येथे होणार आहे.

शोकाकुल : समस्त घरत व ठाकूर परिवार

टिप - कुणीही कुठल्याही प्रकारचे दुखवटे आणू नये.



# लोकेश पाटील, स्वस्तिका घोषचा सत्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

पनवेल उलवे येथील आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन खेळाडू व गिनीज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये आपले नाव कोरणारा लोकेश पाटील आणि इंडोनेशियात रौप्यपदक मिळविणारी भारतीय टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोष यांचा शाश्वत हिंदूचे राष्ट्रीय संयोजक संजय शर्मा व कोकण संघटना मंत्री राजेश राय यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

उलवे नोड सेक्टर १७ येथील हनुमान मंदिरात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी शाश्वत हिंदूचे राष्ट्रीय संयोजक संजय शर्मा यांनी देशासाठी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

जीवेत् शरदः शतम्!

अजित राणे

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक
राजू मढवी

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com